दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

वैभव विवेक स्वामी
सपादक
SAMARTH RAJYOG
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे अंक –३४९ | गुरूवार दि.२७ ऑगस्ट २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-349 | Thursday, Dt.27 August 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# महाप्रलयामुळं ९५ जणांचा मृत्यू, १०५ भारतीय बेपत्ता

नेपाळ : नेपाळमध्ये आलेल्या महाप्रलयामुळं मोठं नुकसान झालं आहे. महाप्रलयामुळं आतापर्यंत ९५ लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर, जवळपास ५०० लोक बेपत्ता असल्याची माहिती आहे, यामध्ये १०५ भारतीयांचा समावेश आहे. भारताच्या विदेश मंत्रालयानं नेपाळमध्ये अचानक आलेल्या महापुरामुळं प्रभावित झालेल्या भारतीय नागरिकच्या थेट बचाव कार्यासाठी तातडीनं बचाव कार्य आणि मदत पोहोचवण्यासाठी काठमांडू येथील भारतीय उच्चायुक्त नेपाळ सरकारसोबत सातत्यानं समन्वय करत आहे.

विदेश मंत्रालयाच्या माहितीनुसार बेपत्ता असलेल्या १०५ भारतीय नागरिकांची आणि ३७ अनिवासी भारतीयांची माहिती ज्यांना घ्यायची आहे, त्यांच्यासाठी आपातकालीन फोन नंबर जारी करण्यात आले होते. नेपाळमधील भारतीय उच्चायुक्तानं केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं की नेपाळमध्ये आज अचानक आलेल्या पुरामुळं अडकलेल्या भारतीय नागरिकांच्या थेट बचावासाठी आणि मदत पोहोचवण्यासाठी नेपाळ सरकारच्या



संबंधित अधिकाऱ्यांसोबत ते संपर्कात आहेत. नेपाळ सरकारसोबत समन्वय साधत बचाव कार्य केलं जात असल्याचं सांगण्यात आलं आहे.

भारतानं मदत पाठवली

विदेश मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटलं की नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी पुराचा सामना करण्यासाठी भारतानं १० टन आपत्ती मदत कार्य साहित्य आणि आवश्यक औषधं पाठवली आहेत. महाप्रलयामुळं ज्यांचा मृत्यू झाला त्यांच्या कुटुंबीयांप्रती आमच्या संवेदना आहेत. संकटकाळात भारत नेपाळ आणि त्यांच्या नागरिकांसोबत असल्याचं जयशंकर म्हणाले.

भारतानं नेपाळला शक्य तितकी मदत करण्याचा शब्द दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांच्यासोबत चर्चा केली आहे. नेपाळला आवश्यक असलेली मदत करण्यास तयार असल्याचं नेपाळच्या पंतप्रधानांना सांगण्यात आलं आहे. नेपाळच्या भाऊ आणि बहिणींसोबत भारत ठामपणे उभा आहे. आमच्या टीम बचाव आणि मदत कार्यात मदत करत असल्याचं मोदी म्हणाले.

## संकटात धावून आले ‘बजरंग बप्पा’

# ससून रुग्णालयात संध्या गायकवाड यांची घेतली आस्थेने भेट

वडवणी प्रतिनिधी : –

बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी माहिती मिळताच पुणे येथील ससून रुग्णालयात उपचार घेत असलेल्या संध्या सुरज गायकवाड यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली. यावेळी त्यांनी संध्या गायकवाड यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांच्या प्रकृतीची सद्यस्थिती जाणून घेतली.व सर्व मदत करण्याचे आश्वासन कुटुंबाला दिले.



खासदार सोनवणे यांनी संबंधित डॉक्टरांशी चर्चा करून संध्या गायकवाड यांच्या उपचाराबाबत सविस्तर माहिती घेतली. त्यांना आवश्यक उपचार योग्य पद्धतीने आणि वेळेत मिळावेत, उपचारात कोणतीही कमतरता राहू नये तसेच रुग्णाची योग्य काळजी घेतली जावी, याबाबत त्यांनी डॉक्टरांशी चर्चा केली.

संकटाच्या काळात केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष रुग्णालयात पोहोचून रुग्णाची विचारपूस करणे आणि उपचाराबाबत डॉक्टरांशी चर्चा करून पाठपुरावा करणे, ही लोकप्रतिनिधी

# चिमुकल्यांच्या ताटात अळ्या–भुंगे आता निकृष्ट वाटाण्याची गोणी नदीकाठावर

## दैनिक समर्थ राजयोग च्या वृत्ताने प्रशासन हादरले जामखेडनंतर कवडगावात संशयास्पद प्रकार

भोंगळ कारभार लपविण्याचा प्रयत्न तर नाही ना? अंबडच्या अंगणवाड्यांमध्ये नेमके चालले तरी काय? जिल्हाधिकारी आशिमा मित्तल मॅडम लक्ष देणार का ?

अंबड प्रतिनिधी :

चिमुकल्यांच्या हातात पुस्तक खेळणी आणि ताटात पौष्टिक आहार असायला हवा.मात्र अंबड तालुक्यातील अंगणवाड्यांमध्ये पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत एकापाठोपाठ एक गंभीर प्रकार समोर येत असतील तर हा प्रकार केवळ निष्काळजीपणाचा नसून बालकांच्या आरोग्याशी निगडित गंभीर प्रश्न बनला आहे.जामखेड येथील अंगणवाडीच्या पोषण आहारातील शिऱ्यात अळ्या आणि वाटाण्यात भुंगे आढळल्याच्या तक्रारीचे वृत्त दैनिक समर्थ राजयोग ने प्रसिद्ध केल्यानंतर प्रशासनाची धावपळ सुरू झाली.त्यानंतर आता कवडगाव येथे निकृष्ट दर्जाचा संशय असलेली वाटाण्याची गोणी नदीकाठावर आढळून आल्याने या प्रकरणाभोवती संशयाचे धुके अधिकच दाट झाले आहे.ही गोणी नेमकी कुठून आली तिचा पोषण आहाराच्या पुरवठ्याशी काही संबंध आहे का? माल निकृष्ट असल्यास त्याची विल्हेवाट नदीकाठावरच का लावण्यात आली? या प्रश्नांची उत्तरे आता प्रशासनाने देणे गरजेचे आहे.

अळ्या–भुंग्यांनंतर नदीकाठावर गोणी योगायोग की पुरवठा साखळीतील दुवा?

जामखेडमधील तक्रारीनंतर कवडगाव नदीकाठावर वाटाण्याची गोणी आढळणे हा निव्वळ योगायोग



# समर्थ राजयोगचे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर..!

## दिव्यांगांच्या विशेष शाळेतील विनोद खडके, सौ.जनाबाई जाधव, रवींद्र आरबाड, अशोक तळपती, रुपेश भोजापुरे, अनिता चौधरी, उद्धव कदम, शरद तळेकर आणि अशोक चव्हाण सर पुरस्काराचे ठरले मानकरी..!!



बीड /प्रतिनिधी

दैनिक समर्थ राजयोगच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त यावर्षी दिव्यांगांच्या विशेष शाळेतील आदर्श शिक्षकांना सन्मानित करण्यात येणार आहे. हा सन्मान त्यांच्या हातून होत असलेल्या दिव्यांगांच्या सेवेची दखल घेऊन हेलन केलर राज्यस्तरीय आदर्श शिक्षक प्रेरणा पुरस्कार २०२६ देवून सन्मानित करण्यात येणार आहे.

दैनिक समर्थ राजयोग आपल्या वर्धापन दिनानिमित्त मागील सहा वर्षापासून शिक्षक दिनाचे औचित्य साधत दिनांक ५ सप्टेंबर रोजी शिक्षण क्षेत्रातील दुर्लक्षित, वंचित असलेल्या घटकांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करत आहे.

यावर्षी बीड जिल्ह्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळेतील संस्था चालक, आदर्श शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या मान्यवरांना हेलन केलर राज्यस्तरीय आदर्श शिक्षक प्रेरणा पुरस्कार २०२६ ने सन्मानित करण्यात येणार आहे. यावर्षी पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत सर्वश्री, परिवर्तन सेवाभावी संस्था नेकनूर अंतर्गत अस्थिव्यंग निवासी विद्यालय नेकनुरचे कलाशिक्षक श्री विनोद शंकरराव खडके, जनार्दन शिक्षण प्रसारक मंडळ येळंबघाट अंतर्गत मतिमंद निवासी विद्यालय उमरी तालुका केज येथील मुख्याध्यापिका सौ. जनाबाई कोंडीबा जाधव, रेणुका माता बहुउद्देशीय सेवाभावी संस्था महांडुळा तालुका गेवराई अंतर्गत मतिमंद निवासी विद्यालय गेवराईचे मुख्याध्यापक रवींद्र शंकरराव अरबाड,

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

दै. समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
७ वा वर्धापन दिन विशेषांक-२०२६

प्रति,
मा.श्री./सौ./श्रीमती

स.न.वि.वि.
मागील ६ वर्षांपासून मराठवाडा स्तरावर प्रकाशित होणारे शासनमान्य यादीवरील ‘दै.समर्थ राजयोग’ चा ७ वा वर्धापन दिन शनिवार दि.५ सप्टेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. आजपर्यंत आपल्या पाठवळावर कणखर बाणा कायम ठेवून निर्भीडपणे लिखन करत वृत्तपत्र वाचकांच्या विश्वासाला पात्र ठरले आहे. या निमित्ताने आम्ही ‘वर्धापन दिन विशेषांक २०२६’ चा विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेषांकामध्ये आपल्या संस्थेची प्रतिष्ठाणची, व्यवसायाची अथवा वैयक्तिक जाहिरात देवून वृत्तपत्राला भक्कम आर्थिक साथ द्यावी ही नम्र विनंती.

आपला विश्वासू
वैभव विवेक स्वामी (संपादक)
मो.9822628521

वर्धापन दिन जाहिरात दरपत्रक

| क्र | विवरण | साईज | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | रंगीत | पूर्ण पान | ४०,०००/– |
| २. | रंगीत | अर्धे पान | २०,०००/– |
| ३. | रंगीत | पाव पान | १०,०००/– |
| ४. | रंगीत | शुभेच्छा | ५,०००/– |

दिनदर्शिका-२०२७ जाहिरात दरपत्रक

| क्र | विवरण | साईज | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | १२ पेज | पूर्ण पट्टी | ३०,०००/– |
| २. | ६ पेज | पुर्ण पट्टी | २०,०००/– |
| ३. | १२ पेज | उभी पट्टी | ३०,०००/– |
| ४. | शुभेच्छा | पॅनल | २,०००/– |

कृपया आपण आपली व्यक्तिगत/संस्थेची जाहिरात वर दिलेल्या चौकोणात ✓ अशी मान्यता देऊन जाहिरात द्यावी ही नम्र विनंती.

प्रति,
मा.संपादक/व्यवस्थापक साहेब, दै.समर्थ राजयोग, बीड
महोदय,
वर्धापन दिन विशेषांक २०२६ किंवा दिनदर्शिका २०२७ करीता माझी वैयक्तिक/संस्थेची जाहिरात रु................/- पर्यंत प्रसिद्ध करावी. सदरील जाहिरात पोटी ॲडव्हान्स रु............./- रोख/चेक/डी.डी./ऑनलाईन जमा करत आहे.
जाहिरातदाराचे नाव :
गाव : तालुका : जिल्हा :
मो.नं. :
₹5000/– ची जाहिरात देऊन वार्षिक वर्गणीदार विनामुल्य व्हा...!
जाहिरात पाठविण्यासाठी संपर्क :–
दै.समर्थ राजयोग कार्यालय
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : vaibhav11swami@gmail.com

जाहिरातीचे ऑनलाईन पेमेंट पाठवण्यासाठी
vaibhav swami
Bank Of Maharashtra 3712
Scan this code to pay me
गुगल पे/फोन पे नंबर 9822628521
बँके खाते : दै.समर्थ राजयोग
बँक ऑफ महाराष्ट्र
A/c No. - 60392843322
IFC Code - MAHB0001689
MICR Code - 431014303



## संपादकीय....

# मुंबई गुदमरतेय...

सात बेटांचे शहर असलेली मायानगरी मुंबई ही केवळ देशाची आर्थिक राजधानीच नाही, तर लाखो लोकांसाठी त्यांची स्वप्नं पूर्ण करणारी एक स्वप्ननगरी आहे. देशाच्या कानाकोपऱ्यांतून नागरिक उदरनिर्वाहासाठी इथे येतात आणि अनेकजण कायमचे इथलेच होऊन जातात. आता एवढ्या मोठ्या प्रमाणात ज्या शहरात लोकं येतात, तिथे त्या प्रमाणात सोयी-सुविधाही असायलाच हव्यात, हेही तितकेच खरे. पण, या सोयी-सुविधा पुरविण्यासाठी आणि शहराला जागतिक दर्जाचे 'हाय-फाय' शहर बनविण्यासाठी विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा जो काही ऱ्हास सुरू आहे, त्याचे दुष्परिणाम आता दिसायला सुरुवात झाली आहे.

गेल्या काही वर्षांत शहराचा वेगवान विकास, बेसुमार काँक्रिटीकरण आणि हवामान बदलामुळे येथील पर्यावरण आणि नागरिकांच्या सुरक्षेवर थेट परिणाम होऊ लागला आहे. या धोक्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी 'क्लायमेट ॲक्शन नाऊ' ही मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेच्या केंद्रस्थानी तीन गंभीर मुद्दे आहेत - झाडे आणि खारफुटीची कत्तल, अति-काँक्रिटीकरण आणि वाढती उष्णता.सध्या मुंबई महानगर प्रदेशात विविध विकासकामे युद्धपातळीवर सुरू आहेत. आधीच मुंबईत जागेची कमतरता असल्यामुळे या विकासकामांच्या मार्गात येणारी झाडे तोडण्याचा सपाटा सुरू झालाय आणि हे कमी म्हणून की काय, तर आता मुंबईचे नैसर्गिक बचाव कवच असलेली खारफुटी हटवण्याचेही प्रयत्न सुरू झाले आहेत.खारफुटी ही काही केवळ झाडे नाहीत. ती मुंबई आणि ठाणे किनारपट्टीसाठी नैसर्गिक सुरक्षा कवच आहेत. भरतीच्या लाटा, चक्रीवादळ, किनारपट्टीची धूप आणि पूर यांपासून शहराचे रक्षण करण्याचे काम खारफुटीची झाडे करतात. सामान्य जंगलाच्या तुलनेत खारफुटी पाचपट अधिक कार्बन डायऑक्साईड शोषून घेतात आणि त्यांना वाढण्यासाठी सुमारे १०० वर्षे लागतात.

मात्र आता विकासाच्या नावाखाली त्यांची मोठ्या प्रमाणावर कत्तल सुरू झाली आहे. वर्सोवा-भाईंदर किनारी रस्त्यासाठी तब्बल ४५,६७५ खारफुटीची झाडे तोडण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी डहाणू ते आंबेसरी दरम्यान ८४७ खारफुटीची झाडे तोडण्याची परवानगी मागणाऱ्या याचिकेवर नुकतीच मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली.१४ जुलै रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. न्यायालय म्हणाले, मुंबईत आधीच ऑक्सिजन कमी आहे. जर हिरवे आवरण असेच कमी होत राहिले, तर तो दिवस दूर नाही जेव्हा लोकांना ऑक्सिजनचे शॉट घेण्यासाठी ऑक्सिजन सिलिंडर घेऊन फिरावे लागेल.भरपाई वनीकरणाच्या ढिसाळपणावरही न्यायालयाने बोट ठेवले. तुम्ही फक्त झाडे लावल्याचे चित्र तयार करता. ती जिवंत आहेत की नाही हे पाहायला तुम्ही मागे वळून पाहत नाही, असे निरीक्षण नोंदवत, खारफुटी जिथे तोडली तिथेच किंवा त्याच जिल्ह्यातील खराब झालेल्या खारफुटीच्या जमिनीवर भरपाई करावी, सोलापूरसारख्या दूरच्या ठिकाणी नव्हे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. दुसरा मुद्दा आहे काँक्रिटीकरणाचा. बेसुमार काँक्रिटीकरणामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरत नाही, त्यामुळे झाडांची मुळे गुदमरून झाडे मरतात. परिणामी, शहराचे तापमान वाढते. तसेच, मुळांना जमिनीत पसरण्यास जागा न मिळाल्याने वृक्ष उन्मळून पडतात. त्यामुळे जीवित व वित्तहानी उद्भवते. मार्च २०२५ मध्ये दाखल झालेल्या सर्वेक्षण अहवालाची दखल घेत २ जुलै २०२६ रोजी उच्च न्यायालयाने मुंबई महापालिकेला निर्देश दिले, की वृक्षांच्या डी-काँक्रिटायझेशनचे काम केवळ औपचारिकता म्हणून करू नये. वृक्ष कोसळून होणारे अपघात टाळण्यासाठी डी-काँक्रिटायझेशन अनिवार्य आहे, यावर न्यायालयाने भर दिला. याचिकाकर्त्यांनी आरोप केला, की महापालिकेने चुकीची माहिती देऊन न्यायालयात खोटी प्रतिज्ञापत्रे सादर केली आहेत.

पान १ वरून..

**चिमुकल्यांच्या ताटात ...**

आहे की या दोन्ही घटनांमध्ये काही संबंध आहे याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.

गोणीवर पुरवठादार बॅच क्रमांक किंवा इतर ओळख पटविणारी माहिती असल्यास ती तपासणीसाठी महत्त्वाचा धागा ठरू शकते.त्यामुळे गोणी जप्त करून तिचा पंचनामा करावा त्यातील वाटाण्याचे नमुने अधिकृत प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत आणि त्याचा पुरवठादार व वितरणाची संपूर्ण साखळी तपासावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.गोणी नदीकाठावर फेकली म्हणून प्रकरणही नदीत बुडणार आहे का? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

गोणीचा पंचनामा करा नमुने प्रयोगशाळेत पाठवा

कवडगाव नदीकाठावर आढळलेल्या गोणीचा तातडीने पंचनामा करून ती प्रशासनाने ताब्यात घ्यावी. त्यातील वाटाण्याचे नमुने शासकीय किंवा अधिकृत प्रयोगशाळेत तपासावेत. गोणी कुणी आणली कुणी फेकली ती कुठून आली कोणत्या पुरवठादाराची आहे आणि कोणाच्या ताब्यात होती याचा मागोवा घेणे आवश्यक आहे.या एका गोणीचा स्रोत सापडला तर पोषण आहाराच्या पुरवठा साखळीतील अनेक प्रश्नांची उत्तरे मिळण्याची शक्यता आहे.चौकशी सुरू आहे चा जप नको अहवाल कधी येणार? जामखेड प्रकरणाबाबत चौकशी सुरू असल्याचे सांगितले जात असले तरी आता नागरिकांना केवळ आश्वासन नको आहे. चौकशी कोणत्या अधिकाऱ्यांकडून सुरू आहे आहाराचे नमुने प्रयोगशाळेत पाठविले आहेत का त्याचा अहवाल कधी येणार दोष आढळल्यास जबाबदारी कोणाची निश्चित होणार पोषण आहाराचा पुरवठा कोणत्या यंत्रणेमार्फत होतो साठवणूक कुठे केली जाते पुरवठ्याच्या प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता तपासणी कोण करते? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने स्पष्टपणे द्यावीत.

पोषण आहाराच्या गुणवत्तेत त्रुटी आढळल्यास केवळ अंगणवाडी सेविका किंवा मदतनीसांवर जबाबदारी ढकलून प्रकरण मिटविण्याचा प्रयत्न होऊ नये.खरेदीपासून साठवणूक,वाहतूक,वितरण आणि गुणवत्ता तपासणीपर्यंत संपूर्ण यंत्रणेची चौकशी झाली पाहिजे.माल कुणी खरेदी केला कुणी स्वीकारला कुणी तपासला कुणी साठवला कुणी वितरित केला आणि नियमित तपासणी कुणी केली या प्रत्येक टप्प्यावर जबाबदारी निश्चित झाली पाहिजे.

अंबड तालुक्यातील सर्व अंगणवाड्यांची सरप्राईज तपासणी करा

जामखेड आणि कवडगावातील घटनांच्या पार्श्वभूमीवर अंबड तालुक्यातील सर्व अंगणवाड्यांची अचानक तपासणी करण्याची मागणी जोर धरत आहे.

या तपासणीत पोषण आहाराचा प्रत्यक्ष साठा वाटाणे-डाळी व इतर धान्याची गुणवत्ता स्टॉक रजिस्टर खरेदी-वितरण नोंदी बॅच क्रमांक मुदत साठवणूक व्यवस्था स्वच्छता बालकांना दिले जाणारे प्रत्यक्ष प्रमाण आणि पर्यवेक्षिकांच्या तपासणी नोंदी यांची काटेकोर पडताळणी करण्यात यावी.

तपासणीची तारीख आधीच जाहीर केली तर कागदोपत्री सर्व काही व्यवस्थित दाखविण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे तपासणी अचानकच झाली पाहिजे अशी मागणी नागरिक करीत आहेत.दोषींना वाचविण्याचा प्रयत्न झाला तर अधिकारीही जबाबदार

चौकशीत अनियमितता अथवा गैरप्रकार आढळल्यास केवळ कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर कारवाई करून प्रकरण संपवू नये. तक्रारींकडे दुर्लक्ष करणारे वेळेवर तपासणी न करणारे किंवा अनियमितता आढळूनही कारवाई न करणारे अधिकारी-कर्मचारी यांचीही जबाबदारी निश्चित झाली पाहिजे.

माहिती नव्हती चूक झाली चौकशी सुरू आहे या कारणांच्या आड बालकांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्न झाकता कामा नये.

जिल्हाधिकाऱ्यांनी फाईल नव्हे अंगणवाडी गाठावी

या घटनांची गंभीरता लक्षात घेता जालना जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतंत्र पथक नियुक्त करून अंबड तालुक्यातील अंगणवाड्यांची अचानक तपासणी करण्याचे निर्देश द्यावेत अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

कार्यालयात बसून अहवाल मागविण्यापेक्षा अधिकारी प्रत्यक्ष अंगणवाडीत पोहोचले धान्याची पोती उघडली साठ्याची पाहणी केली आणि नोंदी तपासल्या तरच वस्तुस्थिती समोर येऊ शकते.

पान १ वरून..

विशेषत कवडगाव नदीकाठावर आढळलेली वाटाण्याची गोणी या प्रकरणातील महत्त्वाचा दुवा ठरू शकते. त्यामुळे तिचा स्रोत आणि पुरवठा साखळी शोधणे अत्यावश्यक आहे.

चिमुकल्यांच्या ताटातील घासाशी खेळ कुणाचा

बालकांच्या पोषणासाठी शासन कोट्यवधी रुपयांच्या योजना राबविते.मात्र या योजनांचा लाभ प्रत्यक्ष चिमुकल्यांच्या ताटात दर्जेदार आहाराच्या रूपाने पोहोचतो आहे का हा मूलभूत प्रश्न आहे.

एका बाजूला अळ्या-भुंगे आढळल्याच्या तक्रारी आणि दुसऱ्या बाजूला नदीकाठावर आढळलेली निकृष्ट वाटाण्याची संशयित गोणी या घटनांकडे आता प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे.आता आश्वासन नको अहवाल आणि कारवाई हवी कवडगावातील गोणीचा स्रोत कोणता जामखेडमधील प्रकरणाचे वास्तव काय? अंबड तालुक्यातील इतर अंगणवाड्यांमध्येही अशीच परिस्थिती आहे का? पोषण आहाराच्या पुरवठा साखळीत कुठे त्रुटी आहेत? या सर्व प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने जनतेसमोर ठेवली पाहिजेत.

चिमुकल्यांच्या ताटातील घास हा कुणाच्या निष्काळजीपणाचा बळी ठरता कामा नये. चौकशीत गैरप्रकार अथवा अनियमितता सिद्ध झाल्यास संबंधितांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे.चौकशी सुरू आहे या एका वाक्याने प्रकरण दडपण्याचा काळ आता गेला. कवडगावच्या नदीकाठावर आढळलेली ती गोणी केवळ धान्याची गोणी नाही ती अनेक अनुत्तरित प्रश्नांची गोणी आहे. ती उघडून तिचा स्रोत शोधला तरच या संपूर्ण प्रकरणामागील सत्य बाहेर येईल

**समर्थ राजयोगचे ....**

जनार्दन शिक्षण प्रसारक मंडळ येळंबघाट अंतर्गत मूकबधिर निवासी विद्यालय माजलगावचे मुख्याध्यापक अशोक महालिंग थळपती, उत्कर्ष सेवाभावी संस्था तागडगाव तालुका शिरूर कासार अंतर्गत मतिमंद निवासी विद्यालय शिरूर कासारचे विशेष शिक्षक रुपेश नथुजी भोजापुरे, बाबासाहेब परांजपे प्रतिष्ठान अंबाजोगाई अंतर्गत कर्तव्य मतिमंद मुलींचे निवासी विद्यालय अंबाजोगाईच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनिता श्रीरंगराव चौधरी, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान अंबाजोगाई अंतर्गत बोधवर्धिनी मतिमंद निवासी विद्यालय आंबेजोगाईचे विशेष शिक्षक उद्धव रामराव कदम,छत्रपती शाहू महाराज अपंग पुनर्वसन संस्था आष्टी अंतर्गत छत्रपती शाहू महाराज निवासी अपंग विद्यालय आष्टीचे शिक्षक शरद चंद्रकांत तळेकर, ग्रामीण विकास महिला व बहुउद्देशीय सेवाभावी संस्था नाथापूर तालुका जिल्हा बीड अंतर्गत साईनाथ मतिमंद निवासी विद्यालय नाथापूरचे मुख्याध्यापक अशोक अंकुशराव चव्हाण यांना पुरस्कार जाहीर झाला असून या आदर्शवत, गुणवंत शिक्षकांचा मान्यवरांच्या शुभहस्ते शनिवार दिनांक ५ सप्टेंबर २०२६ रोजी स्मृतिचिन्ह, सेवा गौरव प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ, झाड भेट देऊन त्यांना फेटा बांधून सर्वांच्या उपस्थितीत जाहीर राज्यस्तरीय सत्कार करण्यात येणार आहे. अशी माहिती कार्यक्रमाचे आयोजक दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी आणि कार्यकारी संपादक शेख आयेशा मॅडम यांनी दिली आहे.

**ससून रुग्णालयात....**

म्हणून संवेदनशील भूमिका असल्याचे यावेळी दिसून आले.

याबाबत ड. भास्कर उजगरे, नेते राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष), वडवणी यांनी खासदार बजरंग सोनवणे यांच्या भूमिकेचे कौतुक केले. लोकप्रतिनिधी म्हणजे केवळ राजकारण करणारा नेता नव्हे, तर संकटाच्या काळात सामान्य माणसाच्या पाठीशी उभा राहणारा आधार असतो. गोरगरीब आणि गरजू नागरिकांच्या अडचणीच्या काळात खासदार बजरंग सोनवणे यांनी घेतलेला पुढाकार निश्चितच आश्वासक आहे, असे ड. उजगरे यांनी म्हटले.

संध्या गायकवाड यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी आणि त्यांना आवश्यक उपचार मिळून त्या लवकरात लवकर बऱ्या व्हाव्यात, अशी सदिच्छा खासदार सोनवणे यांनी व्यक्त केली.

संकटात धावून येणारा लोकप्रतिनिधी म्हणजेच खरा लोकनेता!

संध्या गायकवाड यांच्या उपचारासाठी पुण्यापर्यंत पोहोचून प्रत्यक्ष भेट घेणे, डॉक्टरांशी चर्चा करणे आणि उपचाराबाबत माहिती घेणे सर्वातोपरी मदत करणे , या माध्यमातून खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी माणुसकी व लोकसेवेला प्राधान्य दिल्याचे चित्र या भेटीतून समोर आले.

# रेडेकरवस्ती,मुळेवस्ती परिसरामध्ये तीव्र पाणीटंचाई

पाण्याचे टँकर सुरू करण्याची आ.सुरेश धस यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी परिसरामध्ये पावसाच्या कमतरतेमुळे भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. रेडेकर वस्ती, मुळेवस्ती आणि पारधीवस्ती भागातील नागरिकांना गेल्या महिनाभरापासून पिण्याच्या पाण्यासाठी तीव्र हाल सोसावे लागत आहेत. या समस्येची तात्काळ दखल घेऊन परिसरात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघाचे आ. सुरेश आण्णा धस यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

रेडेकर वस्ती येथील नागरिक विष्णू सदाशिव रेडेकर यांनी हे निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, सध्या पावसामुळे पाणीपातळी खालावली असून रेडेकरवस्ती, मुळेवस्ती आणि पारधीवस्ती परिसरात गेल्या एक महिन्यापासून पिण्याचे पाणी अजिबात उपलब्ध नाही. त्यामुळे रहिवाशांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. केवळ नागरिकच नव्हे, तर या भागात सुमारे १०० जनावरे असून त्यांनाही पिण्याचे पाणी मिळत नसल्याने त्यांचे मोठे हाल होत आहेत.

माणसांसोबतच मुक्या प्राण्यांचे पाण्यासाठी होणारे हाल लक्षात घेता, आ. सुरेश आण्णा धस यांनी नगरपंचायत कार्यालयाला योग्य ते निर्देश देऊन या भागात तातडीने पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करावेत, अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे.



बीड - लघु पाटबंधारे विभाग, जि.प. बीड येथे पेन्शन अदालत बैठकीत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करताना महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष शेख वजीर, जिल्हाध्यक्ष हनीफखान पठाण, ज्येष्ठ मार्गदर्शक निराळे, जिल्हा उपाध्यक्ष ध्रुपद यादव, जिल्हा कोषाध्यक्ष सुग्रीव नेटके, देविदास बर्डे तसेच कनिष्ठ प्रशासनाधिकारी राजेंद्र ओव्हाळ, स्मिता मुदीराजन व संबंधित पदाधिकारी.

# जिल्हा परिषदेच्या शाळा महिन्याभरात सुविधायुक्त करा : जयकुमार गोरे

मुंबई प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, वीज व वर्गखोल्यांची प्रत्यक्ष पाहणी करून आठ दिवसांत अहवाल सादर करावा. उपलब्ध सुविधांनुसार शाळांचे 'ए, बी, सी, डी' असे वर्गीकरण करावे, असे निर्देश ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

बैठकीस शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, ग्रामविकास विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, शालेय शिक्षण विभागाचे सचिव रणजित सिंह देओल तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, वर्गखोल्या व वीज यांना प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या. मूलभूत सुविधांसाठी ग्रामपंचायत निधीचा वापर करण्याबाबत शासन निर्णय काढण्यात येणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी शाळांची प्रत्यक्ष पाहणी करून यू-डायसवरील माहितीची पडताळणी करावी, असेही निर्देश देण्यात आले.

सीईओंनी शाळांची प्रत्यक्ष पाहणी करावी : दादाजी भुसे

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी शाळांना नियमित भेटी देऊन सुविधांची पाहणी करण्याच्या सूचना दिल्या. शाळा व परिसर स्वच्छतेसाठी शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक व ग्रामस्थांचा सहभाग वाढवावा. विविध निधी तसेच सामाजिक उत्तरदायित्व निधीतून शाळांच्या विकासासाठी प्रस्ताव सादर करावेत, असेही त्यांनी सांगितले.

# ग्रामसभा अर्धवट सोडून सरपंच-ग्रामसेवक निघून गेले, ८ दिवसांपासून ग्रामस्थांचे उपोषण

चौकशी करून ग्रामसभा नियमानुसार घेण्यासह दोषींवर कारवाईची मागणी

पंडित, क्षीरसागर, यशराज पंडित यांची आंदोलनस्थळी भेट

गेवराई । प्रतिनिधी

ग्रामसभा सुरू असताना सरपंच व ग्रामसेवकांनी सभा पूर्ण न करता सभास्थळ सोडल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या घटनेची चौकशी करून ग्रामसभा नियमानुसार पूर्ण घ्यावी, नागरिकांचे प्रश्न व निवेदने नोंदवावीत आणि दोषींवर कारवाई करावी, या मागणीसाठी दि. १८ ऑगस्टपासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर आठ दिवसांपासून शांततामय उपोषण सुरू आहे.

याबाबत ग्रामस्थांनी दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी सरपंच व ग्रामसेवकांना लेखी पूर्वसूचना दिली होती. ग्रामसभा अर्धवट सोडल्यामुळे नागरिकांना प्रश्न, तक्रारी व सूचना मांडण्याची संधी मिळाली नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

उपोषणकर्ते व्यंकट घोडके, विष्णू घोडके, लक्ष्मण घोडके, मोहन घोडके, सचिन घोडके, तुकाराम घोडके, जगदीश शिंदे यांनी ग्रामसभा पारदर्शक व कायदेशीर पद्धतीने घेण्याची मागणी केली आहे.

दरम्यान, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, आमदार संदीप क्षीरसागर आणि युवा नेते यशराज पंडित यांनी उपोषणस्थळी भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांना ग्रामस्थांच्या मागण्या सोडविण्याच्या सूचना केल्या. बीड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांनीही उपोषणकर्त्यांची दोन वेळा भेट घेतली; मात्र समाधान न झाल्याने आंदोलन सुरूच आहे.


ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या

ग्रामसभा सोडून जाण्याच्या घटनेची चौकशी, ग्रामसभा नियमानुसार पूर्ण घेणे, प्रश्न व निवेदनांची अधिकृत नोंद करणे, इतिवृत्त तयार करणे, दोषींवर प्रशासकीय कारवाई करणे

# दुर्मिळ आजारावरील उपचाराला आ. सुरेश धस यांचा मदतीचा हात, शांताबाई नाईकनवरे यांना दिलासा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील शांताबाई धोंडीराम नाईकनवरे यांना जीबीएस (त्र्ीॅळश्रश्ररळप-इरीीं.डूपवीेश) या दुर्मिळ आजाराची लागण झाली होती. उपचारासाठी महागड्या इंजेक्शन्सची आवश्यकता असल्याने कुटुंब आर्थिक अडचणीत सापडले होते. ही बाब भाजपचे ज्येष्ठ नेते तथा आमदार सुरेश धस यांच्या निदर्शनास येताच त्यांनी तातडीने मदतीचा हात देत उपचारासाठी आवश्यक व्यवस्था केली.



शांताबाई यांना उपचारा दरम्यान २५ हजार रुपये किमतीची तब्बल १२ इंजेक्शन्स देण्यात आली. आ. धस यांच्या मदतीमुळे उपचार वेळेत पूर्ण होऊन शांताबाई यांची प्रकृती आता स्थिर असून त्या पूर्णपणे बऱ्या झाल्या आहेत.गरजू कुटुंबाच्या अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहून उपचाराचा आधार देता आला, हीच खरी जनसेवा आहे, अशी भावना आ. सुरेश धस यांनी व्यक्त केली.

दरम्यान, शांताबाई यांचे नातू आदित्य नाईकनवरे यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे आ. धस यांचे मनःपूर्वक आभार मानले. तसेच संकटाच्या काळात सहकार्य करणारे नगरसेवक रामेश्वर गोरे, ड. महेश बेदरे आणि सोमनाथ कोळे यांचेही नाईकनवरे कुटुंबीयांनी आभार व्यक्त केले. आ. धस यांच्या तत्पर मदतीचे पाटोदा परिसरात कौतुक होत आहे.

# न्या. सुनील शुक्रे यांनी महाराष्ट्र लोकायुक्त अध्यक्षपदाची शपथ घेतली

मुंबई प्रतिनिधी

मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी महाराष्ट्र लोकायुक्त अध्यक्षपदाची शपथ घेतली. लोकभवन येथे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी त्यांना शपथ दिली. त्यांची नियुक्ती पाच वर्षांसाठी किंवा वयाची ७० वर्षे पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे आधी असेल तोपर्यंत राहणार आहे.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, विधानसभा सदस्य भास्कर जाधव, मावळते लोकायुक्त न्या. विद्यासागर कानडे, गोवा लोकायुक्त न्या. संदीप शिंदे, मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे व मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी नियुक्तीची अधिसूचना वाचली. न्या. शुक्रे यांनी पुणे विद्यापीठातून पदवी, एलएलबी व एलएलएम शिक्षण घेतले असून विविध न्यायिक पदांवर काम केले आहे. ऑक्टोबर २०२३ मध्ये ते उच्च न्यायालयातून निवृत्त झाले. त्यानंतर त्यांची महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली होती.



# 'अंतर्गत तक्रार निवारण समिती विद्यार्थ्यांचे सुरक्षा कवच' - प्रा. डॉ. शैलजा बरुरे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंतर्गत तक्रार निवारण समिती ही लैंगिक शोषणाला प्रतिबंध करणारी असून विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी ती सुरक्षा कवच आहे. विद्यार्थ्यांनी निर्भीडपणे समाजात वावरावे, असे मत प्रा. डॉ. शैलजा बरुरे यांनी व्यक्त केले. त्या अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत देशमुख होते.

यावेळी आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या प्रतिनिधी अंजली पवार (खाडप) यांनी मासिक पाळीदरम्यान विद्यार्थिनींनी घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात डॉ. प्रशांत देशमुख यांनी विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण आवश्यक असल्याचे सांगितले.

प्रास्ताविक व परिचय प्रा. डॉ. संपदा कुलकर्णी यांनी केले. शपथवाचन प्रा. अर्चना जोशी, तर आभार प्रा. सविता बुरांडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. ज्ञानेश्वर सोनवणे, योगेश्वरी खाडे, प्रकाश मैत्रे, धनराज कासारे यांनी परिश्रम घेतले. यावेळी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# गुन्हे तपासात पोलिसांवर राजकीय दबावतंत्र की पोलीस ठाण्यात मॅनेजमेंट ?

तामसा :(प्रतिनिधी )भोकर-हिमायतनगर मार्गावरील पारवा पाटीजवळ एका कंत्राटी कंपनीच्या वाहनाचा व मोटारसायकल च्या झालेल्या भीषण अपघातात दोन मजुरांचा जागीच मृत्यू, तर एक मजूर गंभीर जखमी झाल्याची घटना घडली होती. या दुर्घटनेप्रकरणी तपास सुरू असतानाच चालक बदलण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात असून, त्यामुळे संपूर्ण प्रकरणाच्या तपासावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या दुर्घटनेप्रकरणी दि. २१ जुलै २०२६ रोजी तामसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी बदलण्यात आल्याची चर्चा परिसरात सुरू असून, या चर्चेमुळे पोलिसांच्या तपासाच्या निष्पक्षतेबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

अपघाताच्या वेळी घटनास्थळी उपस्थित असलेल्या काही प्रत्यक्षदर्शींनी चालक बदलण्याच्या प्रकाराबाबत संशय व्यक्त केला असून, पोलिसांवर राजकीय दबावतंत्राचा वापर करण्यात आला असावा, अशी भावना व्यक्त केल्याचे समोर येत आहे. मात्र, या आरोपांची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही.

राजकीय दबावाचा तपासावर परिणाम होतोय का?

गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता पुरावे, प्रत्यक्षदर्शींचे जबाब आणि उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे कारवाई करणे अपेक्षित असते. मात्र, एखाद्या प्रकरणात राजकीय किंवा प्रभावशाली व्यक्तींचा हस्तक्षेप झाल्याची भावना निर्माण झाली, तर त्याचा सर्वाधिक फटका सामान्य आणि गरीब नागरिकांना बसतो, अशी चर्चा आता सुरू झाली आहे.

कायद्यापुढे सर्व समान ही भूमिका प्रत्यक्ष तपासातही दिसली पाहिजे. अपघातात जीव गमावलेल्या मजुरांच्या कुटुंबीयांना न्याय मिळण्यासाठी तपास पारदर्शक आणि निष्पक्ष होणे गरजेचे आहे. त्यामुळे चालक बदलल्याची चर्चा खरी आहे का, आरोपी बदलण्यामागे नेमके कारण काय, तसेच तपासादरम्यान कोणत्याही प्रकारचा दबाव आणला गेला का, याची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

या प्रकरणात पोलिसांनी उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज, वाहनातील व घटनास्थळावरील पुरावे, प्रत्यक्षदर्शींचे जबाब आणि संबंधित कंपनीची कागदपत्रे तपासून अपघाताच्या वेळी प्रत्यक्ष वाहन कोण चालवत होते, याची स्पष्टता करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरम्यान, या प्रकरणातील राजकीय दबावाच्या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नसल्याने संबंधित पोलीस अधिकारी, तपास यंत्रणा आणि कंपनीची बाजू समोर आल्यानंतरच संपूर्ण चित्र स्पष्ट होणार आहे. मात्र, दोन मजुरांच्या मृत्यूच्या या गंभीर प्रकरणात आरोपी कोण आणि चालक कोण? या प्रश्नाचे उत्तर निष्पक्ष तपासातून मिळणे आवश्यक असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.

# आ.सुरेश धस यांच्या माध्यमातून रुग्णांना मोठा दिलासा

## वैद्यकीय उपचारांसाठी १ लाख ९९ हजारांची मदत व सवलत

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) लोकनेते आ. सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून आष्टी विधानसभा मतदारसंघातील गरजू रुग्णांना वैद्यकीय उपचारांसाठी सातत्याने मदत मिळवून दिली जात आहे. आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या कुटुंबांना उपचारांचा मोठा खर्च परवडत नसल्याने अशा रुग्णांना विविध शासकीय योजना व धर्मादाय संस्थांच्या माध्यमातून आर्थिक मदत आणि उपचारांच्या बिलात सवलत मिळवून देण्यासाठी आ. सुरेश आण्णा धस यांच्या कार्यालयाकडून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे.

याच अनुषंगाने खडकत (ता.आष्टी) येथील अडीच वर्षांची चिमुकली ओजस्वी किशोर पवार हिच्यावर पुणे येथील दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल येथे उपचार सुरू होते. उपचारानंतर डिस्चार्जच्या वेळी तिचे एकूण वैद्यकीय बिल १ लाख ३८ हजार रुपये झाले होते. धर्मादाय योजनेअंतर्गत या बिलाच्या ५० टक्के रकमेची, म्हणजेच ६९ हजार रुपयांची सवलत मिळवून देण्यात आली. त्यामुळे ओजस्वीच्या कुटुंबाला मोठा आर्थिक दिलासा मिळाला.

ही सवलत मिळवून देण्यासाठी रुग्णसेवक अमर वाळके यांनी आ. सुरेश आण्णा धस यांच्या कार्यालयाच्या माध्यमातून आवश्यक पाठपुरावा केला. संबंधित कागदपत्रांची पूर्तता करून धर्मादाय योजनेचा लाभ मिळवून देण्यात आला.

दरम्यान, घाटा पिंपरी (ता.आष्टी) येथील वेदांत आमटे यांच्या वैद्यकीय उपचारासाठी मुख्यमंत्री सहायता निधी योजनेतून ८० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. तसेच तवलवाडी (ता.आष्टी) येथील दत्ता आठरे यांच्या उपचारांसाठीही मुख्यमंत्री सहायता निधीतून ५० हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

अशा प्रकारे या तीनही रुग्णांच्या उपचारांसाठी मिळून एकूण १ लाख ९९ हजार रुपयांची आर्थिक मदत व वैद्यकीय बिलात सवलत मिळाली आहे. आर्थिक अडचणींच्या काळात उपचारांसाठी मिळालेल्या या मदतीमुळे संबंधित रुग्णांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मतदारसंघातील कोणत्याही गरजू रुग्णाला केवळ आर्थिक अडचणीमुळे उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी आ. सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहायता निधी, धर्मादाय योजना तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. रुग्णांना वेळेवर उपचार मिळावेत, त्यांच्या कुटुंबावरील आर्थिक भार कमी व्हावा आणि संकटाच्या काळात त्यांना आधार मिळावा, या उद्देशाने रुग्णसेवेचे हे कार्य सुरू असल्याचे सांगण्यात आले. रुग्णांच्या उपचारासाठी मिळालेल्या या मदतीमुळे आष्टी मतदारसंघातील गरजू कुटुंबांना मोठा



आधार मिळत असून, अडचणीच्या काळात मदतीचा हात मिळाल्याची भावना संबंधित कुटुंबीयांनी व्यक्त केली आहे.

# द्वितीय श्रावणी सोमवारी श्री सिद्धेश्वर मंदिरात भक्तीचा महासागर

## 'बाबा अमरनाथ बर्फानी' रूपाचे मनोहारी दर्शन

माजलगाव : माजलगावचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर मंदिर येथे श्रावण मास उत्सवानिमित्त द्वितीय श्रावणी सोमवार विविध धार्मिक व भक्तिमय कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पंचक्रोशीतील हजारो भाविकांच्या उपस्थितीने मंदिर परिसर भक्तीच्या वातावरणाने भारावून गेला.

द्वितीय श्रावणी सोमवारनिमित्त सामूहिक शिवलीलामृत पारायणाची सांगता करण्यात आली.सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत भगवंतास ब्रह्मवृंदांच्या मंत्रोच्चारात अखंड रुद्राभिषेक करण्यात आला. तसेच सुकाणू समितीतील सदस्यांच्या वतीने 'श्री शिवाय नमस्तुभम' या महामंत्राचा अखंड जप करण्यात आला. यामध्ये सव्वा लाख जपाचे पठण करण्यात आले. यासोबतच महिलांनी एकत्रितपणे शिवलीलामृताच्या ११व्या अध्यायाचे १२१ पारायण पूर्ण केले. या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

उत्सवाचे विशेष आकर्षण ठरले ते ह.भ.प. श्री ओम महाराज खोत यांच्या विशेष कीर्तन सेवेचे. त्यांच्या ओघवत्या वाणीतून झालेल्या कीर्तनाने उपस्थित श्रोते मंत्रमुग्ध झाले. पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी या कीर्तन सेवेचा लाभ घेतला.

यावेळी महाशृंगार आरती, सहस्त्र भस्मार्चन व सहस्त्र लाडूंचा भोग अर्पण करण्यात आला. श्री सिद्धेश्वर भगवंताचा 'बाबा अमरनाथ बर्फानी' स्वरूपातील विशेष शृंगार करण्यात



आला. बर्फानी बाबांच्या रूपातील भगवंताचे मनोहारी दर्शन घेण्यासाठी हजारो भाविकांनी मंदिरात गर्दी केली. या अलौकिक रूपाच्या दर्शनाने भाविकांमध्ये भक्तिभाव दाटून आला.

या संपूर्ण धार्मिक सोहळ्याचे यशस्वी नियोजन सुकाणू समितीच्या सदस्यांनी केले. विविध धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन, जप-पारायणाचे आयोजन, भाविकांसाठी आवश्यक व्यवस्था तसेच संपूर्ण उत्सव सुरळीत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी समितीच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनबद्ध कार्यामुळे द्वितीय श्रावणी सोमवारचा हा भक्तिमय सोहळा उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडला.दिवसभर मंदिर परिसरात 'हर हर महादेव'च्या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले होते.

# कै.सौ. शांताबाई तुळशीदास कुरकुटे यांच्या गंगापूजनानिमित्त ह.भ.प. प्रकाश महाराज साठे यांचे किर्तन संपन्न

वडवणी प्रतिनिधी : वडवणी येथील प्रतिष्ठित कुरकुटे परिवारातील कै. सौ. शांताबाई तुळशीदास कुरकुटे यांच्या गंगापूजनानिमित्त चौंडेश्वरी मंगल कार्यालय, वडवणी येथे महाराष्ट्रातील प्रसिद्ध शिवकीर्तनकार ह.भ.प. प्रकाश महाराज साठे यांच्या सुश्राव्य किर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी ह.भ.प. प्रकाश महाराज साठे यांनी संत तुकाराम महाराज यांच्या शेवटची विनवणी । संतजनीं परिसावी । विसर तो न पडावा । माझा देवा तुम्हांसी ।। या अभंगावर निरूपण करत उपस्थितांना भक्ती, संतविचार आणि जीवनाचे मर्म समजावून सांगितले.

आपल्या किर्तनातून महाराजांनी संत तुकाराम महाराजांची विठ्ठल चरणी असलेली अखेरची विनवणी अत्यंत भावपूर्ण पद्धतीने मांडली. हे देवा, माझा तुम्हाला कधीही विसर पडू देऊ नका. मी तुमच्या चरणी आहे, तुमची सेवा करणे एवढेच मला ठाऊक आहे, असा या अभंगाचा भावार्थ त्यांनी उपस्थितांसमोर उलगडला. त्यांच्या रसाळ वाणीतून



संतविचार ऐकताना उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.

गंगापूजनानिमित्त कुरकुटे परिवाराच्या वतीने उपस्थितांसाठी गोड जेवणाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या शेवटी कै. सौ. शांताबाई तुळशीदास कुरकुटे यांच्या स्मृतीस दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

गंध असा जन्म लाभावा, देहाचा चंदन व्हावा;गंध संपला तरी, गंध दरवळत राहावा...या भावनेतून कै. सौ. शांताबाई कुरकुटे यांच्या प्रेमळ आठवणींना उपस्थितांनी उजाळा दिला.

कै. सौ. शांताबाई तुळशीदास कुरकुटे यांच्या पश्चात हनुमंत कुरकुटे, दत्तात्रय कुरकुटे, डिगांबर कुरकुटे अशी तीन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने कुरकुटे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, त्यांच्या आठवणी सदैव स्मरणात राहतील.कार्यक्रमास कुरकुटे परिवारातील सदस्य, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## स्वारातीम विघापिठ उपकुलसचिव पदी पेदेवाड यांच्या नियुक्ती बदल सत्कार..

नवीन नांदेड -स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील कर्मचारी रामदास पेदेवाड यांची पदोन्नतीने उपकूलसचिव पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र सिडको नविन नांदेड यांच्या वतीने करण्यात आला. पेदेवाड यांची पदोन्नती झाल्याबद्दल सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय सिडको येथील कर्मचारी लेखापाल गूंडे बळीराम , लिपीक पाळेकर राजेश्वर, ग्रंथपाल सुनिल राठोड सहा.ग्रथंपाल मोरे संतोष, गणेश तेलंगे यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्यातर प्राचार्य एन.जी.पाटील यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# सरस्वती गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी रचना परदेशी, सचिवपदी निलेश मुथा

## प्रथमच महिलेची अध्यक्षपदी निवड ; गणेशोत्सव अधिक उत्साहात व सामाजिक बांधिलकीने साजरा करण्याचा निर्धार

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

गुरुवारपेठ येथील गेल्या अनेक दशकांपासून अविरत कार्यरत असलेल्या व वर्षभर सामाजिक उपक्रम व सलोखा जपणारा प्रतिष्ठित सरस्वती गणेश मंडळाच्या २०२६-२७ या कालावधीसाठी अध्यक्षपदी कु. रचना किशोरकुमार परदेशी, तर सचिवपदी निलेश मुथा यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. मंडळाची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

या बैठकीत मंडळाची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. उपाध्यक्षपदी आलोक मोदी व गौरव शर्मा, कोषाध्यक्षपदी योगेश परदेशी, युवक अध्यक्षपदी हर्ष परदेशी, मिरवणूक अध्यक्षपदी समीर लाटा, मिरवणूक उपाध्यक्ष शेखर जोशी, सांस्कृतिक अध्यक्षपदी शेख जावेद भाई,निलेश परदेशी, सांस्कृतिक महिला अध्यक्ष मनीषा माने, प्रसिद्धी प्रमुखपदी आकाश मोदी, डेकोरेशन प्रमुखपदी पूनम परदेशी, विशाल खानपुरिया,महेश परदेशी,लखन शर्मा,आशिष परदेशी,विक्रम परदेशी, यांची निवड करण्यात आली.

तसेच महाप्रसाद प्रमुखपदी मुकुंद बंग, निहाल परदेशी व संतोष परदेशी, बाल अध्यक्षपदी युग जैस्वाल आणि बाल उपाध्यक्षपदी प्रसाद माने यांची निवड करण्यात आली.अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविल्याबद्दल रचना परदेशी यांनी मंडळातील सर्व ज्येष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते व सदस्यांचे मनःपूर्वक आभार मानले.मंडळाचे नाव



अधिक उंचावण्यासाठी जास्तीत जास्त वेळ आणि प्रयत्न देऊन, सर्वांच्या सहकार्याने एकदिलाने कार्य करू. गणेशोत्सवाबरोबरच विविध सामाजिक, सांस्कृतिक व विधायक उपक्रम दर वर्षीपेक्षा दुपट्टीने करण्याचा भर राहील,तरी अंबाजोगाईकरांनी प्रतिसाद द्यावा असे नवनिर्वाचित अध्यक्षा रचना परदेशी यांनी सांगितले.

सरस्वती गणेश मंडळाने मागील काळात विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय सहभाग नोंदवत अनेक बक्षिसे मिळविली आहेत. महाराष्ट्र शासनामार्फत आयोजित स्पर्धेत सलग दोन वेळा जिल्हास्तरीय बक्षीस पटकावण्यात मंडळाला यश आले असून, यंदा राज्यस्तरीय बक्षीस मिळविण्याचा मानस मंडळाने व्यक्त केला आहे.नवनियुक्त सर्व पदाधिकारी व सदस्यांचे मंडळाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. यावेळी यंदाचा गणेशोत्सव अधिक उत्साहात, शिस्तबद्ध पद्धतीने आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्याचा निर्धार करण्यात आला.

# अखिल भारत हिंदू महासभा महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची निवड संपन्न

बीड /प्रतिनिधी

अखिल भारत हिंदू महासभा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा रुपाली जयंत देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्हा कार्यकारिणीची निवड व पद वाटप नुकतेच करण्यात आले.यांचा पदग्रहण सोहळा लवकरच करण्यात येणार आहे. जिल्ह्यात महिला संघटन अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने विविध पदांवर कार्यकर्त्यींची नियुक्ती करण्यात आली.

यात जिल्हा उपाध्यक्ष - सौ.भगवती परदेशी, सौ. लता राऊत, सरचिटणीस - सौ.डॉ. रुपाली सुलाखे, श्रीमती सविता देव, महिला संपर्क प्रमुख - सौ. दिपाली देशमुख, सुदेशना सरवदे, प्रसिद्धी प्रमुख - सौ. मधुमती मुसळे, सुवर्णा भारते, संघटन प्रमुख



- वैशाली पुरंदरे, श्रीमती वंदना देशमुख, कायदेविषयक सल्लागार - सौ. संगीता वैद्य कोकीळ. यांची कार्यकारणीत नियुक्ती करण्यात आली आहे.

याच अनुषंगाने महिला संवाद - माझी समस्या, माझा आवाज हे अभियान जिल्ह्यात राबविण्याचा मानस असून, महिलांना आपल्या समस्या मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच महिलांसाठी विविध सामाजिक, सांस्कृतिक व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.बीड जिल्ह्यातील सर्व तालुके व गावांमधील महिलांनी या संघटनेशी जुळून सदस्य म्हणून सहभागी व्हावे, असे आवाहन महिला आघाडीच्या जिल्हा प्रमुख रुपाली देशपांडे यांनी केले.

यावेळी शेवटी एकमेकींना साथ देऊ या, महिलांचा आवाज बुलंद करूया आणि मजबूत महिला संघटन उभे करूया.! असे सर्व महिला पदाधिकाऱ्यांनी एकसुरात म्हटले.

## जाहीर प्रकटन

सर्व संबंधितांना या जाहीर प्रकटनाद्वारे सूचित करण्यात येते की श्री.नानासाहेब रावसाहेब शिंदे वय ४६ वर्षे व्यवसाय शेती रा.लालवाडी ता.अंबड जि.जालना यांनी मौजे बेलगाव ता.अंबड जि. जालना येथील गट नं.०३ मधील श्री.बाबासाहेब रोहीदास राक्षे रा.सुखापुरी ता. अंबड जि.जालना यांच्या मालकी-कब्जातील जमिनीपैकी ८,३२० चौ.फुट ०० हे. ०७.६४ आर जमीन रु. ५,३५,०००/- या मोबदल्यात कायमस्वरूपी खरेदी करण्याचा करार केला आहे.सदर व्यवहारापोटी खरेदीदाराने विक्रेत्यास रु. २,००,०००/- आगाऊ रक्कम अदा केली असून उर्वरित रु. ३,३५,०००/- रक्कम तीन महिन्यांच्या आत अदा करून नोंदणीकृत खरेदीखत करून घेण्यात येणार आहे.

सदर जमिनीची चतु:सीमा
पूर्वेस :- सखाराम विश्वनाथ मोताळे
पश्चिमेस :- ३३ के.व्ही. पूल
दक्षिणेस :-सरकारी गायरान
उत्तरेस :-सुखापुरी ते तीर्थपुरी सरकारी रस्ता

सदर मिळकतीवर कोणाचाही मालकी हक्क,हितसंबंध, गहाण,तारण,बोजा,विक्रीचा करार अथवा न्यायालयीन/महसूल प्रकरण असल्यास संबंधितांनी या जाहीर प्रकटनाच्या प्रसिद्धीपासून ७ दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रांसह खाली नमूद व्यक्तीकडे लेखी हरकत नोंदवावी.विहित मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मिळकत निर्विवाद समजून पुढील खरेदीखताचा व्यवहार करण्यात येईल.त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकती अथवा दाव्याची दखल घेतली जाणार नाही.

दिनांक २४/०८/२०२६

**खरेदीदार**
**श्री.नानासाहेब रावसाहेब शिंदे**
**रा.लालवाडी ता.अंबड जि. जालना**
**मो. ९६२३७३०७७७**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-११९१ दि.०७.०८.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **राजेश नारायण चव्हाण, रा.दुनगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | युवांक्षी राजेश चव्हाण | मुलगा | ०७.०७.२०२० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०७/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# सांगली स्थानिक गुन्हे शाखेची दमदार कारवाई

## विश्रामबागमध्ये पिस्टलसह रेकॉर्डवरील गुन्हेगार जेरबंद,६२ हजारांचा मुद्देमाल जप्त

सांगली । सनी लोंढे

अवैध शस्त्रांचा वाढता वापर रोखण्यासाठी सांगली पोलिसांनी सुरू केलेल्या धडक मोहिमेला आणखी एक मोठे यश मिळाले आहे. विश्रामबाग परिसरात देशी बनावटीचे पिस्टल आणि दोन जिवंत काडतुसे घेऊन फिरणाऱ्या रेकॉर्डवरील गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने (एलसीबी) सापळा रचून जेरबंद केले. या कारवाईत पोलिसांनी तब्बल ६२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सांगलीचे पोलीस अधीक्षक तुषार दोशी आणि अपर पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर यांच्या सूचनेनुसार एलसीबीचे पोलीस निरीक्षक संजीव झाडे याच्या मार्गदर्शनाखाली अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात कारवाईची मोहीम सुरू आहे. याच मोहिमेदरम्यान पोलीस उपनिरीक्षक महादेव पोवार यांच्या पथकातील पोलीस हवालदार रणजीत जाधव यांना एका संशयिताबाबत गोपनीय माहिती मिळाली.

रेकॉर्डवरील आरोपी मधुसुदन महेश मगदुम (वय २४, रा. गल्ली नं. ६, हसनी आश्रम, विश्रामबाग) हा जुना धामणी रोड परिसरात कमरेला पिस्टल लावून थांबला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी तातडीने परिसरात सापळा रचला आणि संशयिताला ताब्यात घेतले.

पंचांसमक्ष त्याची झडती घेतली असता त्याच्या कमरेला डाव्या बाजूला पॅन्टमध्ये ६० हजार रुपये किमतीचे देशी बनावटीचे एक पिस्टल, तर उजव्या खिशात २ हजार रुपये किमतीची दोन जिवंत काडतुसे आढळून आली. शस्त्र बाळगण्यासाठी आवश्यक परवान्याबाबत विचारणा केली असता आरोपीकडे कोणताही परवाना नसल्याचे समोर आले.

पिस्टल आणि जिवंत काडतुसे असा एकूण ६२ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. अवैधरीत्या घातक शस्त्र बाळगून फिरणाऱ्या रेकॉर्डवरील आरोपीला वेळीच ताब्यात घेतल्याने संभाव्य गंभीर गुन्ह्याला आळा बसल्याचे मानले जात आहे.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल अभिजीत माळकर यांच्या फिर्यादीवरून विश्रामबाग पोलीस ठाण्यात गु.र.नं. २६४/२०२६ अन्वये आर्म्स क्ट कलम ३, २५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१), (३)/१३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास विश्रामबाग पोलीस करीत आहेत.

एलसीबीच्या पथकाची धडाकेबाज कामगिरी

ही कारवाई पोलीस निरीक्षक संजीव झाडे, सहायक पोलीस निरीक्षक राजेंद्र यादव, पोलीस उपनिरीक्षक




महादेव पोवार, पोलीस हवालदार रणजीत जाधव, अतुल माने, प्रकाश पाटील, संदीप पाटील, श्रीधर बागडी, अभिजीत माळकर, संकेत कानडे, ऋषिकेश सदामते, केतन चव्हाण, सुरज थोरात, विनायक सनदी तसेच सायबर विभागातील विजय पाटणकर यांच्या पथकाने केली.

शस्त्र बाळगणाऱ्यांना पोलिसांचा स्पष्ट इशारा

सांगली शहर व परिसरात अवैध शस्त्रांच्या माध्यमातून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. रेकॉर्डवरील गुन्हेगारांकडून बेकायदेशीर शस्त्रांचा वापर होण्याची शक्यता लक्षात घेता एलसीबीकडून संशयित हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

विश्रामबागमधील ही कारवाई केवळ एका आरोपीला अटक करण्यापुरती मर्यादित नसून 'शस्त्र बाळगाल तर कायद्याच्या कचाट्यात याल', असा स्पष्ट संदेशच सांगली पोलिसांनी दिला आहे. आगामी काळातही अवैध पिस्टल, गावठी कट्टे, काडतुसे आणि इतर घातक शस्त्रे बाळगणाऱ्यांविरोधात धडक कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांच्या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

---

अन्नदान करून अनोखा संदेश..

## गरजूंच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारा 'रखवाला'

## विवेक दादा पोटभरे यांचा वाढदिवस मुकबधिर विद्यार्थ्यांसोबत

माजलगाव प्रतिनिधी : वाढदिवस म्हटला की केक कापणे, शुभेच्छांचा वर्षाव आणि मित्रमंडळींसोबत जल्लोष असे चित्र सर्वत्र पाहायला मिळते. मात्र, या परंपरेला फाटा देत माजलगावचे माजी नगरसेवक विवेक दादा पोटभरे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त मुकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांसोबत स्नेहभोजन व अन्नदान करून माणुसकीचा अनोखा संदेश दिला. त्यांच्या या उपक्रमातून 'वाढदिवस स्वतःसाठी नव्हे, तर इतरांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्यासाठी' असतो, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले.माजलगाव येथील मुकबधिर विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसोबत विवेक दादा पोटभरे यांनी आपला वाढदिवस साधेपणाने आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा केला. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हास्य आणि त्यांच्या सोबत घालवलेले आनंदाचे क्षण हेच वाढदिवसाचे खरे समाधान असल्याची भावना उपस्थितांमध्ये निर्माण झाली.

समाजातील गरजू, वंचित आणि विशेष विद्यार्थ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची भूमिका विवेक दादा पोटभरे नेहमीच घेतात. त्यामुळेच त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने करण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. अन्नदानासारख्या उपक्रमातून सामाजिक संवेदनशीलता जपण्याबरोबरच




समाजातील प्रत्येक घटकाला आपुलकीची जाणीव करून देण्याचे काम या उपक्रमातून झाले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विजय साळवे, सुप्रसिद्ध डॉक्टर श्रेयस देशपांडे, राजेश साळवे, संपादक परमेश्वर सोळंके, बाळासाहेब आडागळे, प्रचंड सोळंके, अमर साळवे, सनि टाकणखार ,सोमनाथराव जावळे व शिक्षक यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी विवेक दादा पोटभरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याला पुढील काळातही अशीच ऊर्जा मिळावी, अशी सदिच्छा व्यक्त केली. वाढदिवसाच्या निमित्ताने केलेल्या या अन्नदानामुळे मुकबधिर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुललेले हास्यच विवेक दादांसाठी सर्वात मोठी भेट ठरली.

माणुसकी, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकीचा संगम घडवणारा हा वाढदिवस माजलगावमध्ये चर्चेचा आणि कौतुकाचा विषय ठरला.

---

## बीड जिल्ह्यात पावसाची दांडी; माजलगाव तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा

## डॉ. वसीम मनसबदार यांची मागणी

माजलगाव / प्रतिनिधी:

पावसाळा संपत आला तरी बीड जिल्ह्यात अजूनही पुरेसा पाऊस झालेला नाही. पावसामुळे पिके कोमेजून जात असून शेतकरी वर्ग पूर्णपणे हवालदील झाला आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन जिल्ह्यात तात्काळ 'कोरडा दुष्काळ' जाहीर करावा, अशी आग्रही मागणी माजलगाव पंचायत समिती मा. उपसभापती डॉ.वसीम मनसबदार यांनी केली आहे.यंदाच्या पावसाळ्यात सुरुवातीपासूनच पावसाने ओढ दिली आहे. मोसमी पाऊस संपण्याच्या मार्गावर असतानाही विहिरी, कूपनलिका आणि स्थानिक प्रकल्प अद्याप कोरडेच आहेत. कडक उन्हामुळे शेतातील खरिपाची पिके माना टाकत असून डोळ्यांदेखत पिके जळून जात असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. उत्पन्नाची कोणतीही उम्मीद उरलेली नसल्याने बळीराजाच्या अडचणींत वाढ झाली आहे.गतवर्षीच्या हंगामात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या हाताशी आलेला घास हिरावला गेला होता. त्या नुकसानातून शेतकरी सावरतो न सावरतो तोच, यंदा पावसाने दडी मारल्याने हे नवीन आस्मानी संकट ओढवले आहे. सततच्या या असमतोलामुळे शेतकऱ्यांना प्रचंड मोठ्या आर्थिक फटक्याला सामोरे जावे लागत आहे. दुबार पेरणीचा खर्च, खते आणि बियाण्यांचा खर्चही निघणे आता कठीण झाले आहे.

शासकीय मदतीची तातडीने गरज

या सर्व पार्श्वभूमीवर डॉ.वसीम मनसबदार यांनी प्रशासनाचे लक्ष वेधताना स्पष्ट केले की, बीड



जिल्ह्यातील परिस्थिती अतिशय बिकट झाली आहे. पिकांचे पंचनामे करून जिल्हाभरात कोरडा दुष्काळ जाहीर करावा. तसेच शेतकऱ्यांना पिकांची भरपाई, पीक विमा आणि तातडीने आर्थिक मदत देऊन दिलासा द्यावा.

शासनाने या मागणीचा गांभीर्याने विचार न केल्यास शेतकरी संकटाच्या खाईत लोटला जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

---

# सर्वसामान्यांशी नाळ जोडलेले विकासाभिमुख नेतृत्व-माजी आ.बाळासाहेब आजबे काका

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शेतकरी, कष्टकरी, ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक आणि गावागावातील जनतेच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून काम करणारे नेतृत्व म्हणून माजी आ. बाळासाहेब आजबे काका यांनी आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविणे, गावागावातील विकासकामांना गती देणे, पाणी व सिंचनाच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करणे आणि नागरिकांच्या समस्या थेट गावात जाऊन ऐकून घेणे, ही त्यांच्या कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये राहिली आहेत. 'आमदार हा लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी असतो, समस्या निर्माण करण्यासाठी नाही,' या भूमिकेतून त्यांची राजकीय वाटचाल सुरू राहिली आहे.

गेल्या काही वर्षांत मतदारसंघातील गाव, वाडी आणि वस्तीपर्यंत विकासकामे पोहोचविण्यासाठी माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी प्रयत्न केले. रस्ते, पाणी, वीज, सिंचन, बंधारे, पांदण रस्ते आणि इतर मूलभूत सुविधांना त्यांनी त्यांच्या कार्यकाळात प्राधान्य दिले. त्यांच्या पाठपुराव्यातून त्यांच्या कार्यकाळात जवळपास साडेतीन हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांना मंजुरी मिळवून देण्यात आलेली आहे. शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या पांदण रस्त्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पांदण रस्ता योजनेच्या माध्यमातून पाचशेपेक्षा अधिक रस्त्यांच्या कामांना त्यांच्या कार्यकाळात चालना मिळाली. त्याचबरोबर मतदारसंघातील विविध गावांमध्ये बंधारे आणि जलसंधारणाच्या कामांनाही मोठ्या प्रमाणावर प्राधान्य देण्यात आले.

पूर्ण झालेल्या विकासकामांची माहिती जनतेपर्यंत पोहोचावी, मंजूर कामांचे उद्घाटन गावकऱ्यांच्या उपस्थितीत व्हावे आणि शासनाच्या योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने माजी आ. आजबे यांनी गावभेट दौऱ्या सुद्धा केलेला आहे. या दौऱ्यात त्यांनी गावागावात जाऊन ग्रामस्थांच्या भेटीगाठी घेतलेल्या आहेत, नागरिकांच्या समस्या जाणून घेतलेल्या आहेत आणि विकासकामांची माहिती दिलेली आहे. गावातील पारावर बसून नागरिकांशी थेट संवाद साधणे, त्यांच्या अडचणी ऐकून घेणे आणि शक्य त्या पातळीवर प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणे, ही त्यांच्या गावभेटीची विशेष ओळख ठरलेली आहे. त्यामुळे हा दौरा केवळ राजकीय कार्यक्रम न राहता लोकांशी प्रत्यक्ष संवाद साधणारा आणि प्रशासन व जनता यांच्यातील दुवा मजबूत करणारा उपक्रम ठरलेला आहे.

लाडकी बहीण योजना, सौर पंप योजना, मोफत गॅस योजना, मुलींसाठी मोफत शिक्षण तसेच इतर विविध योजनांची माहिती पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यावर त्यांनी भर दिलेला आहे. शासन योजना जाहीर करते; मात्र त्या योजनेचा प्रत्यक्ष लाभ पात्र कुटुंबापर्यंत पोहोचणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी गावागावात जाऊन नागरिकांना योजनांची माहिती द्यावी आणि आवश्यक कागदपत्रे व प्रक्रियेबाबत मदत करावी, असे आवाहन माजी आ. आजबे सततच करीत आहेत. शेतकऱ्यांनी कापूस आणि सोयाबीन पिकांचा पीकपेरा नोंदवून घ्यावा, जेणेकरून शासनाच्या संबंधित अनुदानाचा लाभ मिळण्यास मदत होईल, असेही त्यांनी स्पष्ट केलेले आहे.

माजी आ. बाळासाहेब आजबे यांच्या राजकीय कार्यातील केंद्रस्थानी राहिलेला विषय म्हणजे मतदारसंघातील पाणी आणि सिंचनाचा प्रश्न. शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पोहोचले तर ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल, या विचारातून त्यांनी विविध सिंचन योजनांसाठी सातत्याने पाठपुरावा केला. खुंटेफळ साठवण तलाव हा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. या प्रकल्पासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले. तत्कालीन जलसंपदा मंत्री यांच्याकडे पाठपुरावा करून मोठ्या निधीच्या निविदा प्रक्रियेला चालना देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. त्यानंतर राज्यातील राजकीय परिस्थितीत बदल झाल्यानंतर उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेताना मतदारसंघाचा विकास, खुंटेफळ साठवण तलाव आणि उजनी सिंचन योजनेची पूर्तता हे प्रमुख कारण असल्याचे माजी आ. आजबे यांनी स्पष्ट केले होते.



कुकडी योजनेच्या माध्यमातून सीना आणि मेहकरी धरणांमध्ये पाणी आणण्यासाठीही त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. शेतकऱ्यांना पाण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रात ऊसतोडीसाठी स्थलांतर करावे लागू नये, स्वतःच्या शेतात पाणी उपलब्ध व्हावे आणि शेतीच्या माध्यमातून कुटुंबाची आर्थिक परिस्थिती मजबूत व्हावी, ही त्यांची भूमिका राहिली आहे. या विषयांसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार तसेच विविध वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. बंधारे, सिंचन आणि जलसंधारणाच्या विविध कामांना त्यांनी प्राधान्य दिले. त्यामुळे माती, पाणी आणि शेतकरी यांच्याशी असलेले त्यांचे नाते त्यांच्या कार्यातून प्रकर्षाने जाणवते.

माजी आ. बाळासाहेब आजबे यांना स्वतः शेतीची आवड आहे. राजकीय आणि सामाजिक कामाची मोठी धावपळ असतानाही ते शेतीसाठी वेळ काढतात. सकाळी-संध्याकाळी शेताची पाहणी करणे, शेतीतील कामांची माहिती घेणे आणि प्रसंगी स्वतः ट्रॅक्टर चालविणे यामध्ये त्यांना विशेष आनंद मिळतो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी त्यांना केवळ राजकीय विषय म्हणून नव्हे, तर प्रत्यक्ष अनुभवातून समजतात. संकटाच्या काळात सामान्य नागरिकांच्या अडचणी समजून घेत त्यांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. राजकारणापेक्षा माणूस आणि त्याची अडचण महत्त्वाची, ही भूमिका त्या काळातील त्यांच्या कार्यातून दिसून आली.

माजी आ. बाळासाहेब आजबे यांचा जन्म २८ ऑगस्ट १९६९ रोजी झाला. प्राथमिक शिक्षण त्यांनी प्रवरा लोणी येथे घेतले. पाचवी ते बारावीपर्यंतचे शिक्षण मॉडेल हायस्कूल, पुणे येथे झाले. त्यानंतर कोल्हापूर येथे त्यांनी बी.एस्सी. कृषीचे शिक्षण घेतले. दोन भाऊ आणि चार बहिणी अशा मोठ्या कुटुंबात त्यांचे बालपण गेले. चंद्रकांत भाऊ, स्व. विलास आबा आणि माजी आ. बाळासाहेब आजबे हे भाऊ. ज्येष्ठ नेते बलभीमराव सुंबरे यांच्या कन्या सविता यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यांना यश हा मुलगा आहे. यश याने पुणे येथे शिक्षण घेतले आहे. तोही सध्या युवा नेतृत्व म्हणून पुढे येत आहे. राजकारणाचा वारसा त्यांना वडील भाऊसाहेब काशिनाथ आजबे यांच्याकडून मिळाला. भाऊसाहेब काशिनाथ आजबे हे १९६२ ते १९६७ या कालावधीत आष्टी-पाटोदा विधानसभा मतदारसंघाचे आमदार होते. कणखर नेतृत्व, कार्यकर्त्यांशी असलेला धाक आणि सामाजिक बांधिलकी यासाठी त्यांची ओळख होती. ते बीड जिल्हा बँकेचे अध्यक्षही राहिले. गोरगरीब कुटुंबातील तरुणांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी त्यांनी प्रयत्न केले. या सामाजिक आणि राजकीय वारशाचा प्रभाव माजी आ. बाळासाहेब आजबे यांच्या व्यक्तिमत्त्वावर झाला. मात्र केवळ राजकीय वारशाच्या जोरावर त्यांनी आपले नेतृत्व उभे केले नाही. स्वतःच्या कर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी राजकारणात स्थान निर्माण केले. कोल्हापूर येथे पहिली निवडणूक लढवून विजय मिळवित त्यांनी जीएस म्हणून काम केले. कोल्हापूरहून परतल्यानंतर त्यांनी गावच्या राजकारणात लक्ष घातले. ग्रामपंचायत आपल्या ताब्यात घेतल्यानंतर गावच्या राजकीय वाटचालीत त्यांचा प्रभाव कायम राहिला.

---

## गुटख्याचे ग्रामीण भागात 'पाय पसरले'; शहरात लपूनछपून विक्री सुरू?

पोलिसांची नजर एका दोघांवार. अंदरूनी स्टॉकिस्ट मोकाट ?

तामसा : (प्रतिनिधी)

गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर कायदेशीर निर्बंध असतानाही ग्रामीण भागात त्याचा वाढता फैलाव होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. शहरातील काही ठिकाणी लपूनछपून विक्री सुरू असल्याची चर्चा असून, आता ग्रामीण भागातील किराणा दुकाने, पानटपऱ्या आणि इतर ठिकाणीही गुटख्याची उपलब्धता वाढल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे कारवाईची भीती असतानाही काही विक्रेते गुटखा थेट दुकानात न ठेवता मागील बाजूस किंवा ठरावीक ग्राहकांना संपर्कातून पुरवत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे बंदी असतानाही गुटखा सहज उपलब्ध होत असल्याने संबंधित यंत्रणेच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

ग्रामीण भागातील तरुणांमध्ये तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन वाढत असल्याने पालक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. गुटखा विक्रीला आळा घालण्यासाठी नियमित तपासणी, अचानक छापे आणि विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

'बंदी कागदावरच की प्रत्यक्षात?' असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात असून, संबंधित विभाग गुटखा विक्रीविरोधात आता ठोस कारवाई करणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

---

नेपाळमध्ये अडकलेल्या नांदेड जिल्ह्यातील पर्यटक /कुटुंबीयांनी

## जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्राशी संपर्क साधावा - जिल्हाधिकारी नांदेड यांचे आवाहन

नांदेड जिल्हा प्रतिनिधी :- नेपाळमधील रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला आलेल्या पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, या आपत्तीच्या पार्श्वभूमीवर विविध देशांतील पर्यटक व नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यातील जे पर्यटक सध्या नेपाळमध्ये असून पूरस्थितीमुळे अडकले आहेत किंवा ज्यांचा त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क होत नाही, त्यांनी अथवा त्यांच्या नातेवाईकांनी तात्काळ जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

यासाठी खालील क्रमांकांवर संपर्क साधता येईल : जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्र, नांदेड

/ ०२४६२-२३५०७७ / १०७७ (टोल फ्री) नेपाळमध्ये अडकलेल्या पर्यटकांची माहिती प्रशासनाला देताना संबंधित व्यक्तीचे नाव, मोबाईल क्रमांक, नेपाळमधील सध्याचे ठिकाण/हॉटेल, प्रवासाचा तपशील आणि कुटुंबीयांचा संपर्क क्रमांक उपलब्ध असल्यास तो द्यावा.

नांदेड जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरून न जाता अधिकृत माहितीसाठी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा. आपत्तीग्रस्त भागातील नागरिक व पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती माहिती व समन्वय साधण्याचे प्रयत्न प्रशासनामार्फत करण्यात येत आहेत.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# धर्माबाद शहरात ईद-ए-मिलादुन्नबी उत्साहात, मराठवाडा जनहित पक्षातर्फे विविध उपक्रम

## मिरवणुकीतील नागरिकांना फळे, शुद्ध पाणी, अल्पोपहार व मिठाईचे वाटप,सर्व समाजांचे सण उत्साहात साजरे करण्याचे शंकर अण्णा बोलमवाड यांचे आश्वासन

धर्माबाद / अशोक पडोळे

धर्माबाद शहरात जगाला शांती, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देणारे पैगंबर मोहम्मद यांच्या जयंतीनिमित्त ईद-ए-मिलादुन्नबीचा उत्सव मराठवाडा जनहित पक्षाच्या वतीने हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुस्लिम समाज बांधवांकडून शहरातील प्रमुख मार्गावरून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.



धर्माबाद नगरपरिषदेवर सत्ताधारी असलेल्या मराठवाडा जनहित पक्षाचे सर्वेसर्वा तथा उपनगराध्यक्ष शंकर अण्णा बोलमवाड यांच्या पुढाकारातून ईद-ए-मिलादुन्नबीच्या निमित्ताने मिरवणुकीसाठी आवश्यक विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच मिरवणुकीत सहभागी झालेल्या नागरिकांसाठी फळे, शुद्ध पाणी, अल्पोपहार आणि मिठाईचे वाटप करण्यात आले. पक्षाच्या वतीने घेण्यात आलेल्या या उपक्रमामुळे मुस्लिम समाज बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.या कार्यक्रमास मराठवाडा जनहित पक्षाचे महाराष्ट्र उपाध्यक्ष तथा मुस्लिम समाजातील ज्येष्ठ नेते मोईज सेठ करखेलीकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी धर्माबाद नगरपरिषदेचे गटनेते ताहेर पठाण, बांधकाम सभापती समीर भाई, माजी उपनगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक प्रतिनिधी देविदास बिपटवार, स्वच्छता सभापती अलीमुद्दीन चौधरी, नगरसेवक प्रतिनिधी शुद्धोधन हनुमंत, सुदर्शन गुर्जलवाड, पोतना आईटवार, विजू भाई, नागभूषण सुरकुटवार, अनिल कमलाकर, स्वीकृत सदस्य श्रीनिवास कंबलवाड, पारस गोदा, तसेच शहरातील सर्व मशीद कमिटीचे सदस्य आणि मुस्लिम समाजातील ज्येष्ठ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपनगराध्यक्ष शंकर अण्णा बोलमवाड यांनी ईद-ए-मिलादुन्नबीच्या शुभेच्छा देत, धर्माबाद शहराची ओळख ही सामाजिक सलोखा, एकोपा आणि बंधुभावाची आहे, असे सांगितले. शहरातील प्रत्येक समाजाच्या सण-उत्सवात सहभागी होऊन त्यांना आवश्यक सहकार्य करण्याची भूमिका मराठवाडा जनहित पक्षाची राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.धर्माबाद शहरातील प्रत्येक समाजाचा सण हा आपला सण आहे. सर्व समाजांचे सण याच पद्धतीने उत्साहात आणि एकोप्याने साजरे केले जातील, असे आश्वासन शंकर अण्णा बोलमवाड यांनी यावेळी दिले.

ईद-ए-मिलादुन्नबीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून सामाजिक सलोखा आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल मुस्लिम समाज बांधवांनी मराठवाडा जनहित पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे आभार मानले.

# पावसाने ओढ दिल्याने पिके मान टाकू लागली; शेतकऱ्यांवर अरमानी संकट

## पिकांचे पंचनामे करून हेक्टरी पन्नास हजार रुपये अनुदान द्या: नय्युम पठाण मा चेअरमन

माजलगाव प्रतिनिधी

माजलगाव तालुका पावसाने मोठी ओढ दिल्याने सोयाबीन, मुग, उडीद, कापूस यासह इतर पिके सुकण्याच्या मार्गावर असून अनेक ठिकाणी पिकांनी अक्षरशः मान टाकण्यास सुरुवात केली आहे. पावसाअभावी शेतकऱ्यांसमोर खरीप हंगामाचे संकट उभे राहिले असून शेतकरी चिंतेत सापडला आहे. शेतकऱ्यांना दिलासा म्हणून पिकांचे पंचनामे करून हेक्टरी पन्नास हजार रुपये अनुदान देण्याची मागणी नय्युम पठाण मा चेअरमन

यांनी केली आहे. खरीप पिकाला सध्या पाण्याची नितांत गरज असताना पावसाने दडी मारल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला आहे. त्यामुळे पिके कोमेजत असून पिकाच्या उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. पावसाची प्रतीक्षा करत



शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसला आहे. पावसाअभावी नुकसान झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करण्यात यावेत तसेच शेतकऱ्यांना पीकविमा व अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे. हेक्टरी पन्नास हजार रुपये अनुदान देण्याची मागणी नय्युम पठाण यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केली आहे.

# भागवत अनारसे यांना मानाचा ‘आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार’

## बीड जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांच्या हस्ते सपत्नीक गौरव

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) सराटेवडगाव-आनंदवाडी व दौलावडगाव ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी भागवत शिवाजी अनारसे यांच्या उल्लेखनीय, गतिमान व पारदर्शक प्रशासकीय कार्याची दखल घेत त्यांना ग्रामविकास विभागाचा मानाचा ‘आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. बीड येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या दिमाखदार सोहळ्यात बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान (भा.प्र.से.) यांच्या हस्ते भागवत अनारसे यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला.

सराटेवडगाव-आनंदवाडी आणि दौलावडगाव ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रात ग्रामविकासाला गती देताना भागवत शिवाजी अनारसे यांनी प्रशासन अधिक गतिमान, सुलभ आणि लोकाभिमुख करण्यासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबविले. ग्रामपंचायतीच्या कारभारात पारदर्शकता आणण्याबरोबरच डिजिटल पद्धतींचा प्रभावी वापर करून ग्रामस्थांना विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ सुलभतेने मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या या कामामुळे ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय कामकाजाला अधिक शिस्त व गतिमानता प्राप्त झाली.

गावाच्या स्वच्छता व पर्यावरण संवर्धनालाही त्यांनी प्राधान्य दिले. घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन आणि गावातील स्वच्छता यासाठी विविध उपक्रम राबवून ग्रामस्थांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली. ग्रामस्थांच्या लोकसहभागातून स्वच्छता मोहिमा राबविण्यासोबतच गावाचा परिसर स्वच्छ व पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान’ अंतर्गत विविध शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून त्याचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यातही भागवत अनारसे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. शासनाच्या विविध योजनांची माहिती ग्रामस्थांपर्यंत पोहोचविणे, पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून देणे आणि ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विकासकामांना



गती देणे, यासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला.

गावातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठीही त्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम केले. रस्ते, पाणीपुरवठा, रोजगार हमी योजना तसेच ग्रामपंचायतीशी संबंधित विविध विकासकामांचे योग्य नियोजन व व्यवस्थापन करून विकासकामे प्रभावीपणे मार्गी लावण्याचा प्रयत्न त्यांनी केला. ग्रामपंचायत प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थ यांच्यात समन्वय साधत विकासकामांना लोकसहभागाची जोड देण्याचे कामही त्यांनी केले.

त्यांच्या या उल्लेखनीय प्रशासकीय कार्याची दखल घेत ग्रामविकास विभागाकडून त्यांची ‘आदर्श ग्रामपंचायत अधिकारी’ पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. हा पुरस्कार केवळ भागवत अनारसे यांच्या कार्याचा गौरव नसून सराटेवडगाव-आनंदवाडी व दौलावडगाव ग्रामपंचायतीच्या विकासाभिमुख वाटचालीचाही सन्मान असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

पुरस्कार वितरण सोहळ्यास बीड जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. काळे, आष्टीचे गटविकास अधिकारी श्री. प्रयाग ढमाळ, जिल्ह्यातील विविध पंचायत समित्यांचे गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे पदाधिकारी व सदस्य, तसेच सराटेवडगाव-आनंदवाडी व दौलावडगाव येथील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ आणि रोजगार सेवक यांची प्रमुख उपस्थिती होती.

भागवत शिवाजी अनारसे यांना मिळालेल्या या मानाच्या पुरस्काराबद्दल त्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत असून, त्यांच्या कार्याचे कौतुक केले जात आहे. ग्रामीण भागातील ग्रामपंचायत प्रशासन अधिक सक्षम, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी त्यांचे कार्य इतर ग्रामपंचायत अधिकाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या पुढील प्रशासकीय व सामाजिक वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# कै.भीमरावदादा निकाळजे यांच्या १६ व्या पुण्यतिथीनिमित्त विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून अभिवादन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी येथील नामवंत विधितज्ज्ञ ड. रत्नदीप निकाळजे यांचे पूज्य वडील कै. भीमरावदादा निकाळजे यांच्या १६ व्या पुण्यतिथीनिमित्त विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांच्या पावन स्मृतीस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन केले. पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या अभिवादन कार्यक्रमात कै. भीमरावदादा निकाळजे यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना आदरांजली वाहिली. यावेळी कै. भीमरावदादा निकाळजे यांच्या जीवनकार्याचा गौरव करत त्यांच्या सहवासातील आठवणींना उजाळा देण्यात आला. त्यांच्या साध्या, मनमिळावू आणि आपुलकीच्या स्वभावाचे स्मरण करत उपस्थितांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला. आयुष्यभर जपलेली माणुसकी, नातेसंबंधांतील जिव्हाळा आणि सामाजिक बांधिलकी यामुळे कै. भीमरावदादा निकाळजे यांच्या स्मृती आजही अनेकांच्या मनात कायम असल्याच्या भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

कै. भीमरावदादा निकाळजे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित या कार्यक्रमास सामाजिक, राजकीय, विधी, शिक्षण आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. याप्रसंगी चेअरमन राजेंद्र धोंडे काका, वाल्मीक तात्या निकाळजे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, सेवानिवृत्त गटविकास अधिकारी बबनराव खंडागळे, जालिंदर गायकवाड, काकडे, मिलिंद निकाळजे, बी. एच. कांबळे, प्रा. मल्हारी जाधव, शिक्षक संपतराव गायकवाड, वामनराव निकाळजे सर, ड. रत्नदीप निकाळजे यांच्यासह विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवर, आप्तेष्ट, मित्रपरिवार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी कै. भीमरावदादा निकाळजे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी कै. भीमरावदादा निकाळजे यांच्या आठवणींना उजाळा देताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील गुणांचे स्मरण केले. एखाद्या व्यक्तीचे आयुष्य संपल्यानंतरही त्यांचे विचार, संस्कार आणि आठवणी कुटुंबीयांसह समाजाच्या मनात कायम राहतात, याचे प्रतीक म्हणून त्यांच्या स्मृतींकडे पाहता येते,



अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या. त्यांच्या जीवनातील विविध प्रसंगांचे स्मरण करताना उपस्थितांच्या आठवणी भावूक झाल्या. कै. भीमरावदादा निकाळजे यांनी आपल्या कुटुंबात जपलेले संस्कार आणि आपुलकीचे वातावरण ही त्यांच्या कुटुंबाची मोठी जमेची बाजू असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

नामवंत विधितज्ज्ञ ड. रत्नदीप निकाळजे यांच्यासह निकाळजे परिवाराशी विविध क्षेत्रांतील मान्यवरांचे असलेले जिव्हाळ्याचे संबंध या कार्यक्रमातून प्रकर्षाने दिसून आले. पुण्यतिथीनिमित्त अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून कै. भीमरावदादा निकाळजे यांच्या स्मृतींना अभिवादन केले. सामाजिक जीवनात एखाद्या व्यक्तीने निर्माण केलेली माणुसकीची नाती हीच त्यांची खरी ओळख असते आणि काळाच्या ओघातही ती नाती स्मृतींच्या रूपाने कायम राहतात, याची प्रचिती या कार्यक्रमातून आली.

पुण्यतिथीच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या आप्तेष्ट, मित्रपरिवार आणि नागरिकांनीही कै. भीमरावदादा निकाळजे यांच्या आठवणी सांगत त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला. अनेकांनी त्यांच्या सहवासातील प्रसंगांचे स्मरण करत त्यांच्या स्वभावातील आपुलकी आणि माणुसकीचा उल्लेख केला. त्यांच्या आठवणींना उजाळा देताना उपस्थित वातावरण भावुक झाले होते. सर्वांनी कै. भीमरावदादा निकाळजे यांच्या पावन स्मृतीस मनःपूर्वक आदरांजली अर्पण केली.

कै. भीमरावदादा निकाळजे यांच्या १६व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल असलेला आदर, जिव्हाळा आणि आत्मीयता पुन्हा एकदा अधोरेखित झाली. त्यांच्या स्मृतींना उजाळा देत उपस्थितांनी त्यांच्या जीवनातून मिळणाऱ्या चांगल्या संस्कारांची आणि माणुसकीच्या मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश दिला. भावपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित सर्व मान्यवर, आप्तेष्ट, मित्रपरिवार आणि नागरिकांनी कै. भीमरावदादा निकाळजे यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन करून श्रद्धांजली अर्पण केली.

# भारत मातेच्या पुनर्वैभवासाठी संस्कृतभाषा

संस्कृतभाषा ही भारताचीच नव्हे तर संपूर्ण विश्वाची ज्ञानभाषा आहे.श्रीमद् भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णांनी सांगितलेच आहे की, न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।' या पवित्र ज्ञानाचा सागर असणाऱ्या या भाषेचा गौरव संस्कृत दिना निमित्त करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे ही गोष्ट सर्व संस्कृत अनुरागींसाठी अभिमानाची आहे.संस्कृत दिन व संस्कृत सप्ताहाच्या त्यानिमित्ताने ... .

सर्वासां भाषानां जननी। आपण अनेक भाषा बोलतो. मराठी ही आपली मातृभाषा आहे, हिंदी ही संपर्काची भाषा आहे, इंग्रजी ही आधुनिक ज्ञान-विज्ञानाची महत्त्वाची भाषा आहे. परंतु या सर्व भाषांच्या इतिहासामध्ये संस्कृतचे स्थान अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे.



संस्कृत ही या सर्व भाषांची जननी आहे जननी म्हणजे आई.म्हणूनच संस्कृत भाषेला 'सर्वासां भाषानां जननी। 'म्हटले आहे.

भारतीय ज्ञानपरंपरेचा पाया संस्कृतभाषा - संस्कृत सर्व भाषांची जननी असल्यामुळे अर्थातच ती केवळ एक भाषा नाही तर भारतीय ज्ञानपरंपरेचा पाया आहे. संस्कृत म्हणजे भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे.संस्कृत म्हणजे आपल्या हजारो वर्षांच्या ज्ञानाचा अमूल्य ठेवा आहे.आपल्या पूर्वजांनी गणित, खगोलशास्त्र, आयुर्वेद, व्याकरण, तत्त्वज्ञान, साहित्य, नाट्य, योग, स्थापत्यशास्त्र अशा विविध क्षेत्रांमध्ये जे ज्ञान निर्माण केले, त्यातील मोठा भाग संस्कृत भाषेत आपल्याला उपलब्ध आहे.

भारताची खरी ओळख प्राप्त करण्यासाठी संस्कृत भाषा - संस्कृत ही जगातील प्राचीन भाषांपैकी एक आहे. ऋग्वेदासारख्या प्राचीन ग्रंथांपासून संस्कृतची समृद्ध परंपरा आपल्याला दिसून येते.आपल्या देशात हजारो वर्षांपासून संस्कृतमध्ये ज्ञाननिर्मिती होत आली आहे.

वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, भगवद्गीता, पुराणे, विविध शास्त्रग्रंथ या सर्वांमधून भारतीय विचारविश्वाची विशालता आपल्याला जाणवते.महर्षी वाल्मिकींचे रामायण, महर्षी व्यासांचे महाभारत, भगवान श्रीकृष्णांनी सांगितलेली भगवद्गीता, महर्षी पतंजलींचे योगदर्शन, चरक आणि सुश्रुत यांची आयुर्वेद परंपरा, आर्यभटांचे गणित आणि खगोलशास्त्रातील योगदान'या सर्व ज्ञानपरंपरेशी संस्कृतचा जवळचा संबंध आहे.म्हणून संस्कृत शिकणे म्हणजे केवळ एक विषय शिकणे नाही; तर आपल्या ज्ञानपरंपरेची पर्यायाने भारताची खरी ओळख करून घेणे आहे. संस्कारांसाठी संस्कृत - आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात आपण अतिशय वेगाने पुढे जात आहोत. मोबाईल, इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता, सोशल मीडिया या सर्वांनी जग जवळ आणले आहे.पण या प्रगतीसोबत एक प्रश्नही निर्माण झाला आहे-आपण तंत्रज्ञानाने पुढे जात असताना संस्कारांनीही पुढे जात आहोत का?आपल्याकडे ज्ञान आहे; पण त्यासोबत विवेक आहे का?आपल्याकडे सुविधा आहेत; पण समाधान आहे का?आपल्याकडे संपर्काची साधने आहेत; पण माणसांमध्ये संवाद आहे का?या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आपल्या संस्कृत साहित्यामध्ये मोठी मूल्यपरंपरा आहे.सत्य, अहिंसा, दया, परोपकार, कर्तव्य, संयम, विनय, मातृ-पितृभक्ती आणि सर्वांच्या कल्याणाची भावना या मूल्यांचा संस्कृत वाङ्मयामध्ये वारंवार उल्लेख आढळतो.आधुनिक विज्ञान आणि संस्कृत भाषा - संस्कृत भाषेची रचना अत्यंत शास्त्रबद्ध, नियमबद्ध आणि व्याकरणाच्या स्पष्ट नियमांवर आधारित आहे. त्यामुळे परग्रहावरील बुद्धिमान जीवांशी संपर्क साधताना संस्कृतसारखी नियमबद्ध भाषा उपयुक्त ठरू शकते, असा काही संशोधकांचा विचार आहे. संस्कृतची शब्दरचना, वाक्यरचना आणि व्याकरणातील अचूकता यामुळे संगणकीय भाषाविज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या क्षेत्रांतही संस्कृतचा अभ्यास केला जातो.

यातून एक गोष्ट नक्कीच अधोरेखित होते -

ज्या भाषेची निर्मिती आणि रचना हजारो वर्षांपूर्वी इतक्या शास्त्रशुद्ध पद्धतीने झाली, त्या संस्कृत भाषेचा अभ्यास आजच्या आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगातही महत्त्वाचा ठरतो.

विद्यार्थ्यांसाठी संस्कृतचे महत्त्व - कोणतीही भाषा सुरुवातीला कठीण वाटते; सातत्याने अभ्यास केला की तीच भाषा सुंदर आणि सोपी वाटू लागते.संस्कृतचा अभ्यास केल्यामुळे तुमची शब्दसंपत्ती वाढते, व्याकरणाची समज वाढते, उच्चार सुधारतात आणि इतर भारतीय भाषांकडे पाहण्याची दृष्टीही व्यापक होते.मराठी, हिंदी आणि इतर अनेक भारतीय भाषांमध्ये संस्कृतमधून आलेले असंख्य शब्द आहेत.म्हणून संस्कृत समजली की आपल्या स्वतःच्या भाषेतील अनेक शब्दांचा अर्थ अधिक चांगल्या प्रकारे समजू शकतो.

संस्कृतिः संस्कृताश्रिताः - आपल्या संस्कृतीतील अनेक संस्कार, प्रार्थना, स्तोत्रे आणि श्लोक संस्कृत भाषेत आहेत.

आपण सकाळी म्हणतो -कराग्रे वसते लक्ष्मीः करमध्ये सरस्वती।करमूले तु गोविन्दः प्रभाते करदर्शनम्।।या श्लोकातून आपल्या हातामध्ये श्रम, ज्ञान आणि ईश्वरावरील श्रद्धा यांचा सुंदर समन्वय व्यक्त होतो.तसेच -

सर्वे भवन्तु सुखिनः
सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु
मा कश्चिद्दुःखभाग्भवेत्।।

हा श्लोक तर संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाची भावना व्यक्त करतो.

सर्वजण सुखी होवोत, सर्वजण निरोगी राहोत, सर्वांना मंगल दिसो आणि कोणालाही दुःखाचा भागीदार व्हावे लागू नये.

किती व्यापक विचार आहे.

आज भारताला पुन्हा विश्वगुरुत्वाकडे घेऊन जाण्याचा मार्ग म्हणजे संस्कृतभाषा ठरेल यात शंका नाही.

जयतु संस्कृतम् ।। जयतु संस्कृतम् ।। जयतु संस्कृतम् ।।

लेखक -
**मंगेश नारायणराव मुळी**
८ वी ते १०वी संस्था संस्कृत विषय प्रमुख ,
भारतीय शिक्षण प्रसारक संस्था ,अंबाजोगाई.



## व्हीएलडी इंग्लिश स्कूलमध्ये अन्नपूर्णा राखी मेकिंग स्पर्धा उत्साहात

२५ मातांचा उत्स्फूर्त सहभाग डाळी,तांदूळ,कडधान्यांपासून साकारल्या आकर्षक राख्या

अंबड प्रतिनिधी :- रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील व्हीएलडी इंग्लिश स्कूलमध्ये प्रायमरी व प्रि-प्रायमरीच्या विद्यार्थ्यांच्या मातांसाठी सोमवारी ता.२४ अन्नपूर्णा राखी मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत तुब्बल २५ मातांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कल्पकतेला आणि कलाकौशल्याला वाव देत विविध प्रकारच्या आकर्षक राख्या साकारल्या.

या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे पारंपरिक सजावटीच्या साहित्याऐवजी डाळी,तांदूळ, जिरे,विविध कडधान्ये,मोहरी आदी अन्नधान्यांचा कल्पकतेने वापर करून राखी तयार करण्याचे आव्हान स्पर्धकांसमोर ठेवण्यात आले होते.अवघ्या दीड तासांच्या कालावधीत राखी तयार करायची होती.यासाठी कॅनव्हास, पेपर, विविध डाळी, तांदूळ, जिरे, धागा, फेविकोल, ग्लूगन, मोहरी व पचरंगी धागा एवढ्याच साहित्याचा वापर करण्याची अट होती.मातांनी या आगळ्यावेगळ्या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद देत अन्नधान्यापासून कलात्मक आणि आकर्षक राख्या तयार केल्या. स्पर्धेतील राख्यांचे परीक्षण करण्यात आल्यानंतर विजेत्यांची निवड करण्यात आली.स्पर्धेतील निकाल

प्रथम क्रमांक सौ. वर्षा सचिन गायकवाड, सौ. ज्योती पवन माने व सौ. मंजुश्री कुणाल साहूजी यांनी पटकावला.

द्वितीय क्रमांक सौ. गायत्री निखिल जैन, सौ. मनीषा भरत माता व सौ. प्रियांका तायडे यांनी मिळविला.

तर तृतीय क्रमांक सौ. मेघा दत्ता राऊत, सौ. प्रेमा मयूर गायकवाड, सौ. ज्योती धानुरे, सौ. वैशाली जैन, सौ. पूजा मसलकर व सौ. कोमल ढवळे यांनी पटकावला.

मातांच्या कल्पकतेला सर्जनशीलतेला आणि कलाकौशल्याला व्यासपीठ मिळवून देणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला. अन्नधान्याचा कलात्मक वापर करून साकारलेल्या राख्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. मातांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे स्पर्धेला आगळेवेगळे स्वरूप प्राप्त झाले.

# जालन्यातही मोठे उद्योग उभारण्याची गरज

# रोजगारासाठी तरुणांची मुंबई-पुण्याकडे धाव थांबवा युवा नगरसेवक अश्विन अंबेकर यांची मागणी

जालना शेख फारुक :- रोजगाराचा प्रश्न हा आजच्या तरुणांसमोरील सर्वांत गंभीर प्रश्न आहे. राज्यातील उद्योगांचे मुंबई, पुणे, ठाणे, छत्रपती संभाजीनगर यांसारख्या मोजक्या भागांत झालेले केंद्रीकरण पाहता जालना जिल्ह्यासारख्या विकासाच्या दृष्टीने मागे असलेल्या जिल्ह्यातही मोठे उद्योग उभारणे गरजेचे आहे. उद्योग उभारणीला चालना मिळाल्यास स्थानिक तरुणांच्या हाताला रोजगार मिळून जिल्ह्याच्या विकासालाही गती मिळेल असे प्रतिपादन जालना महानगरपालिकेचे युवा नगरसेवक अश्विन भास्करराव अंबेकर यांनी केले.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेनेतील २० ते ३० वयोगटातील निवडून आलेले युवा लोकप्रतिनिधी विविध संस्था व समित्यांचे सदस्य तसेच महानगरपालिका, नगरपालिका जिल्हा परिषद पंचायत समिती आणि सहकार क्षेत्रातील युवा पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक मुंबई येथे झाली. संसदरत्न युवा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीस योगेश कदम, सिद्धेश कदम, पक्ष प्रवक्त्या शायना एन.सी., खासदार आनंद परांजपे, सचिव भाऊसाहेब चौधरी आदी उपस्थित होते. जालना जिल्ह्यातून महानगरपालिकेचे युवा नगरसेवक अश्विन अंबेकर यांनी सहभाग घेतला.

प्रश्न मांडणे नव्हे उपाययोजना करणे ही जबाबदारी

या बैठकीत डॉ. श्रीकांत शिंदे यांनी युवा लोकप्रतिनिधींशी मनमोकळा संवाद साधला. लोकप्रतिनिधी म्हणून मिळालेल्या पदाचा उपयोग नागरिकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडविण्यासाठी झाला पाहिजे. केवळ समस्या मांडण्यापुरते राजकारण मर्यादित न ठेवता नागरिकांच्या प्रश्नांचा सखोल अभ्यास करून त्यावर ठोस उपाययोजना सुचविणे आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करून घेणे ही युवा लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे असे त्यांनी सांगितले.



प्रत्येक युवा लोकप्रतिनिधीने आपल्या मतदारसंघासह शहर व समाजाचा सखोल अभ्यास करावा. बदलत्या काळानुसार रोजगार, शिक्षण, कौशल्य विकास, तंत्रज्ञान, उद्योग, महिला व युवा सक्षमीकरण, क्रीडा, नागरी सुविधा आणि सामाजिक विकास यांसारख्या विषयांवर केवळ प्रतिक्रिया न देता ठोस धोरणात्मक भूमिका मांडण्याची गरज असल्याचेही डॉ. शिंदे यांनी स्पष्ट केले.

युवा नगरसेवक अंबेकर यांच्याशी आस्थेवाईक संवाद

दरम्यान बैठकीत जालना महानगरपालिकेचे युवा नगरसेवक अश्विन अंबेकर यांनी जालना जिल्ह्यातील रोजगार आणि औद्योगिक विकासाचा मुद्दा ठामपणे मांडला. जालना जिल्ह्यात उद्योगांची संख्या वाढवून स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी नगरसेवक अश्विन अंबेकर यांच्याशी आस्थेवाईकपणे संवाद साधत त्यांच्या मतांची व सूचनांची माहिती घेतली. युवा लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या विविध प्रश्न अडचणी आणि मागण्यांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. तसेच या प्रश्नांवर पुढील काळात कोणत्या पद्धतीने कार्यवाही करता येईल याबाबतही सविस्तर विचारविनिमय झाला.युवा लोकप्रतिनिधींनी स्थानिक प्रश्नांचा अभ्यास करून विकासाचा ठोस अजेंडा पुढे न्यावा असा सूर या बैठकीत उमटला.

# ब्रह्मरस फक्त संतांच्या संगतीतच भेटतो- भागवताचार्य ह.भ.प.काशिनाथ महाराज शास्त्री

## खडकवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहात भक्तिरसपूर्ण कीर्तन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील खडकवाडी येथे संत वामनभाऊ व संत भगवान बाबा यांच्या आशीर्वादाने तसेच महंत काशिनाथ महाराज गणेशगड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित अखंड हरिनाम सप्ताह भक्तीमय वातावरणात सुरू आहे. सप्ताहाच्या पाचव्या दिवशी रात्री ९ ते ११ या वेळेत भागवताचार्य ह.भ.प. काशिनाथ महाराज शास्त्री (सुदर्शन गड, सांगवी पाटण) यांचे प्रेरणादायी व मनाला भावणारे कीर्तन संपन्न झाले.

कीर्तनातून त्यांनी श्रावण महिन्यातील शिवभक्तीचे महत्त्व, गावोगावी असलेल्या शिवालयांचे धार्मिक व आध्यात्मिक महत्त्व तसेच संत परंपरेचा गौरवपूर्ण इतिहास भाविकांसमोर उलगडला. संत ज्ञानेश्वर महाराजांनी भक्तीचा पाया रचला आणि संत तुकोबारायांनी त्यावर कळस चढविला, असे सांगत त्यांनी वारकरी संप्रदायाच्या समृद्ध परंपरेचे महत्त्व स्पष्ट केले.

संत वामनभाऊ यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गौरव करताना काशिनाथ महाराज शास्त्री म्हणाले, संत वामनभाऊ जे बोलत, ते अक्षरशः घडत असे. ते साक्षात अग्नी होते; मात्र त्यांच्या



हृदयात सर्वांसाठी चंद्रासारखी माया होती. भाऊ रागीट नव्हते, तर त्यांचे व्यक्तिमत्त्वच करुणामय होते.

यावेळी त्यांनी संत भगवान बाबांच्या कार्याचा ऐतिहासिक संदर्भही सांगितला. डोंगर-दऱ्यांमध्ये राहणाऱ्या जनतेच्या जीवनातील अज्ञानाचा अंधकार दूर व्हावा आणि ज्ञानाचा प्रकाश त्यांच्या जीवनात पोहोचावा, या उद्देशाने भगवान बाबांनी मराठवाड्यातून पंढरपूरकडे पहिली दिंडी काढली, असे त्यांनी सांगितले.

भाविकांना आध्यात्मिक जीवनाचा संदेश देताना ते म्हणाले, प्रथम नारदेहाला आलात, तर पंढरपूरची वारी करा आणि ज्ञानेश्वरी वाचा. मनुष्यजन्माचे सार्थक भक्ती, ज्ञान आणि संतसंगतीतच असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

शेतकरी व सर्वसामान्यांच्या जीवनाशी निगडित विषयावर भाष्य करताना महाराजांनी समाधानाचे महत्त्व पटवून दिले. आपण पिकलेल्या मालाला भाव देत नाही. पहिली कर्जमाफी तुकोबारायांनी केली. आमचा एकच पक्ष - हरिनाम लक्ष. समाधान मानण्यातच खरा आनंद आहे. जन्म आणि मरण यालाच संसार म्हणतात आणि या जीवनात समतोल असणे परमावश्यक आहे, असा मौलिक संदेश त्यांनी दिला.

त्यांच्या सुरेल वाणीतून सादर झालेले अभंग, भारुडे, भागवत कथा, हरिनाममहिमा आणि संतचरित्र यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. कीर्तनातील प्रत्येक विचार भाविकांच्या मनाला स्पर्श करून गेला. विशेषतः ब्रह्मरस फक्त संतांच्या संगतीतच भेटतो हा त्यांनी दिलेला संदेश उपस्थितांच्या मनावर खोलवर ठसा उमटवून गेला.

संतसंगती, हरिनामस्मरण, वारी, ज्ञानेश्वरीचे वाचन आणि समाधानाचा मार्ग स्वीकारल्यास जीवनाला खऱ्या अर्थाने आध्यात्मिक दिशा मिळते, असा संदेश या कीर्तनातून देण्यात आला.

या भक्तिमय सोहळ्यास पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक तसेच तरुणांनीही कीर्तनाचा लाभ घेतला. हरिनामाच्या गजराने खडकवाडी परिसर दुमदुमून गेला असून अखंड हरिनाम सप्ताहामुळे गावातील वातावरण भक्तिमय झाले आहे.



## माजलगाव येथे श्रावण मासानिमित्त श्रीरामचरित्र मानसचे नवान्ह पारायण संपन्न

माजलगाव प्रतिनिधी : माजलगाव येथील राजस्थानी मंगल कार्यालयात माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने श्रावण मासानिमित्त श्रीरामचरित्र मानसचे नवान्ह पारायण भक्तिमय वातावरणात आयोजित करण्यात आला होता.

माजलगावच्या विख्यात गायिका श्रीमती छाया राजेंद्र शर्मा यांच्या सुमधुर वाणीत पारायणाचे संगीतमय वाचन होत आहे. श्रीमती शर्मा या माजलगावचे स्वर्गीय बाबूलाल शर्मा यांच्या सूनबाई आहेत. आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्राची विशेष आवड असलेल्या श्रीमती शर्मा यांनी आपल्या व्यस्त दैनंदिनीतून वेळ काढून माहेश्वरी महिला मंडळाच्या आग्रहास मान देत नवान्ह पारायणामध्ये निःस्वार्थ भावनेने संगीतमय सेवा केली या संगिता मधुर सुरांस सौ.सोनल घनश्याम मानधने व सौ.निता विक्रम मुंदडा यांनी साथ दिली या रामायण महाप्रसादाचे यजमान सौ.वर्षा बजाज, सौ.डॉ. निर्मला बजाज,सौ.अनुराधा बजाज आणि सौ.सारिका बजाज ह्या होत्या.

पारायणादरम्यान प्रभू श्रीरामचंद्रांच्या जीवनातील विविध प्रसंगांचे देखावे साकारण्यात येत आहेत. दररोजच्या प्रसंगानुसार लहान मुलांची आकर्षक वेशभूषा व सजावट करण्यात येत असून, त्यामुळे कार्यक्रमाला विशेष भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.श्रावण मासातील या धार्मिक उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. या कार्यक्रमास विशेष सहकार्य माहेश्वरी महिला मंडळाच्या सर्व पदाधिकारी व सदस्य व अध्यक्ष अलकनंदा मानधने सचिव अनिता मुंदडा वर्षा भक्कड सविता रांदड, अनिता लोहिया, लीला मानधने,वर्षा बजाज,सुरेखा जेथलिया,सुगना तेला, रत्नमाला इंदानी, किरण कासट यांनी केले.

## माजलगाव नगर परिषदेत विरोधक नसल्याने आता जनतेलाच विरोधकाची भूमिका घ्यावी लागेल : काँग्रेस

माजलगाव प्रतिनिधी : माजलगाव शहरातील विविध प्रलंबित जनहिताच्या मागण्यांकडे नगर परिषदेचे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने नगर परिषदेसमोर धरणे आंदोलन करण्यात आले. शहरातील प्रमुख रस्त्याची तातडीने दुरुस्ती व बांधकाम करावे, फळविक्रेत्यांसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून द्यावी, सार्वजनिक शौचालयाची व्यवस्था करावी, तसेच नगर परिषदेमधील कथित बोगस कामांची चौकशी करावी, अशा विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या.

बाबासाहेब आंबेडकर चौक ते पाटील गल्लीमार्गे साठेनगरपर्यंतचा मुख्य रस्ता तातडीने बांधण्यात यावा, अशी प्रमुख मागणी आंदोलकांनी केली. तसेच बाजारपेठेतील फळविक्रेत्यांच्या समस्यांकडेही प्रशासनाने लक्ष द्यावे, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी नगर परिषदेत सत्ताधारी आणि विरोधक जनहिताच्या प्रश्नांपेक्षा स्वहितासाठी एकत्र आल्याचा आरोप केला. जनतेने आ. प्रकाश सोळंके यांच्या गटाला विरोधी पक्षाची भूमिका बजावण्याचे जनादेश दिले असतानाही सत्ताधारी पक्षासोबत हातमिळवणी केल्याचा आरोप काँग्रेसच्या वतीने करण्यात आला. त्यामुळे नगर परिषदेत प्रभावी विरोधक राहिलेला नसून, आता जनतेलाच विरोधकाची भूमिका घ्यावी लागत आहे, असेही काँग्रेसने म्हटले.

सत्ताधारी पक्षातील अंतर्गत मतभेदांमुळे अद्याप विषय समित्यांच्या निवडी झालेल्या नाहीत. त्यामुळे शहराच्या विकासकामांवर परिणाम होत असून विकास रखडल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

या आंदोलनात काँग्रेसचे तालुकाध्यक्ष महावीर मस्के काका, जिल्हा सचिव सय्यद याकुब, अहमद भाई, रंगनाथ निकम, आफरोज तांबोळी, रशीद भाई, जानुशाह शेख, फारुक शेख, सलीम भाई, हुजेफा शेख, एजाज भाई, शेख मुस्तकीम, बाबा आलझेंडे, आरुण यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.या आंदोलनाला समाजवादी पक्षाचे नवीद भाई तसेच एमआय पक्षाचे इद्रीस भाई यांनी पाठिंबा दिला. दरम्यान, नगर परिषदेचे उपाध्यक्ष सहाल भैय्या चाऊस यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन आंदोलकांच्या मागण्या जाणून घेतल्या. मागण्यांच्या सोडवणुकीबाबत सकारात्मक भूमिका घेत आश्वासन दिल्यानंतर त्यांच्या विनंतीवरून आंदोलन स्थगित करण्यात आले.

# निमगाव पंचक्रोशीतील गावांना विकासासाठी निधी कमी पडणार नाही - आ.बाबुराव कदम

अर्धापूर (प्रतिनिधी): तालुक्यातील निमगाव परिसरात विकासकामांना गती देऊन विविध विकास कामासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू असून लवकरच विकास कामे मार्गी लावणार असल्याचे आश्वासन उपस्थित गावकऱ्यांना आमदार बाबुराव कदम यांनी दिले आहे.

अर्धापूर तालुक्यातील निमगाव येथे दि. २५ मंगळवारी रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख उपस्थितीत आ.बाबुराव कदम, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, शिवसेना जिल्हाप्रमुख विवेक देशमुख,माजी संचालक दत्ता पाटील,भाजपाचे आनंदराव भंडारे,कृऊबाचे सभापती गंगाधर चाभरेकर, तालुकाप्रमुख संतोष कपाटे,

सरपंच संजय मोळके,उपसरपंच वसंतराव चव्हाण, माजी सभापती दिलीपराव देवगुंडे,माजी सभापती श्रीमती पद्मावतीबाई घोरपडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास तसेच स्व.चंद्रकांत घोरपडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी भगव्या ध्वजाचे ध्वजारोहण आमदार कोळेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा पुरस्कारांतर्गत निकषांमध्ये बदल झाल्यामुळे निमगाव आणि निवघा येथील जिल्हा परिषद शाळांना हा बहुमान मिळाला. या पार्श्वभूमीवर आमदार कदम यांनी निमगाव येथील जिल्हा परिषद शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. तर राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे मराठी भाषा विभाग असून त्यांच्या माध्यमातून निमगाव गावाला पुस्तकाचे गाव बनवण्यासाठी नक्की प्रयत्न करू अशी ग्वाही आ. कदम यांनी दिली.

यावेळी रक्तदान शिबिर,वृक्षारोपण मोहीम,मोफत आयुष्यमान कार्ड व जॉब कार्ड वाटप शिबिर आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी विस्तार अधिकारी गिरीधारी मोळके,जमादार संजय घोरपडे,अँड.बळवंत घोरपडे,व्हाईस ऑफ मीडियाचे तालुकाध्यक्ष गोविंद टेकाळे,मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सखाराम क्षीरसागर, दिगंबर मोळके, चेअरमन अनिल मोळके, संजयराव पाटील गोमासे, बिभीषण नरोटे,उपतालुका प्रमुख गणपत सोळंके,गोविंद भरकड,शेती निष्ठ शेतकरी प्रकाश सीतापराव,संतोष कदम, माजी सरपंच संजय जाधव,रूपेश देशमुख,महेश देशमुख,भिमा थोरात, पोलीस पाटील कान्होजी मोळके,यशवंत घोरपडे,

डॉ.अंजुम शेख, ओबीसीचे सक्रिय कार्यकर्ते स्वप्निल राठोड आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## काल्याच्या कीर्तनातून अशोक महाराज शास्त्री यांचे अमृतमय विचार

# संतांचे निस्वार्थ प्रेम आणि गोरगरिबांची सेवा हाच खरा परमार्थ

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील खलाटवाडी येथे वै. गोविंद महाराज यांनी सुरू केलेल्या ३८ व्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरणात झाली. या काल्याच्या कीर्तनाची सेवा गोविंदगडाचे मठाधिपती ह.भ.प. अशोक महाराज शास्त्री यांच्या हस्ते संपन्न झाली. आपल्या रसाळ व ओघवत्या वाणीतील कीर्तनातून त्यांनी उपस्थित भाविकांना हरिनाम, संतसंग, निस्वार्थ सेवा आणि परमार्थाचे महत्त्व पटवून देत जीवनाला दिशा देणारे अमृतमय विचार मांडले.

अशोक महाराज शास्त्री म्हणाले की, जीवनभर जी शिदोरी जमा होईल, तीच पुढे सेवन करायची आहे. त्यामुळे हरिनामाची शिदोरी जमा करा. पुन्हा जन्म व्हावा तो काला खाण्यासाठी, अशी भक्तीची ओढ मनात निर्माण झाली पाहिजे. संत-महात्म्यांच्या सहवासाचे महत्त्व सांगताना त्यांनी, साधू-संत घरी आले तर तोच खरा दिवाळी-दसरा. आपल्या माहेरी यायचे असेल तर सप्ताहामध्येच यायला पाहिजे, असे भावनिक उद्गार काढले.

परमार्थ हा समाजाला दाखविण्यासाठी नसून देवासाठी करायचा असतो, असे स्पष्ट करत महाराज म्हणाले, फक्त हरिनामाची शिदोरीच शेवटी कामाला येते. आपण केलेला परमार्थ प्रसिद्धीसाठी नसावा. तो मनापासून आणि परमेश्वरासाठी असावा.

संतांच्या निस्वार्थ प्रेमाची महती सांगताना त्यांनी वै. गोविंद महाराजांच्या आठवणींना उजाळा दिला. संत हे निस्वार्थ प्रेम करतात. गोविंद महाराज सर्वांवर मनापासून प्रेम करत होते, असे सांगत त्यांनी संतांचे कार्य आणि त्यांची समाजाशी असलेली आत्मीयता अधोरेखित केली.

समाजसेवा आणि गरजूंना मदत करण्याबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना अशोक महाराज म्हणाले, गरज आहे तेवढेच पैसे खर्च केले पाहिजेत. मी मोठी गाडी घेतली नाही. त्याऐवजी हे पैसे गोविंदगड मुलाची वारकरी



शैक्षणिक संस्था चालवण्यासाठी वापरतो. गोरगरिबांच्या मुलांना सांभाळण्याचे काम करतो. त्यांच्या या विचारातून साधेपणा, सामाजिक बांधिलकी आणि शिक्षणाच्या माध्यमातून वंचितांना आधार देण्याचा संदेश उपस्थितांना मिळाला.

समाज काय म्हणेल याचा विचार न करता आपल्या अंतःकरणाला जे योग्य वाटते तेच करावे, असा संदेश देताना त्यांनी सांगितले, आपण काहीही केले तरी समाज नाव ठेवतो. त्यामुळे समाज काय म्हणतो याकडे लक्ष न देता आपल्याला जे पटेल ते करायचे.

भक्त आणि भगवंताच्या नात्याचे उदाहरण देताना त्यांनी सांगितले, कुत्र्याचे शेपूट वाकडे ते वाकडेच असते. जसा मासा पाण्याशिवाय राहू शकत नाही, तसे भगवान भक्ताशिवाय राहू शकत नाही. भक्तीमध्ये सातत्य आणि भगवंताशी असलेले नाते यावर त्यांनी विशेष भर दिला.

तसेच, आपले पुण्य उदयाला आले की आपले सर्व चांगले होते. त्यामुळे समाजाकडे लक्ष द्यायचे नाही; आपला परमार्थ सातत्याने सुरू ठेवायचा, असे सांगत त्यांनी उपस्थितांना नामस्मरण, सत्संग आणि सत्कर्माची वाट धरावी, असे आवाहन केले.

या भक्तिमय कार्यक्रमास युवा नेते जयदत्त भैय्या धस, माजी जिल्हा परिषद सदस्य विजय गोल्हार, अमळनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सतीश कोतकर, पोलीस उपनिरीक्षक सतीश भवर, पोलीस कॉन्स्टेबल शाम खाडे, पोलीस पाटील दादासाहेब खलाटे, शिवरायांचा मावळा समीर शेख, पत्रकार दादा पवळ, अजय खलाटे, संदीप खलाटे, रमेश खलाटे, माऊली खलाटे, पृथ्वीराज खलाटे, रावसाहेब खलाटे, भाऊसाहेब खलाटे, मच्छिंद्र खलाटे, सागर भगत, राजाभाऊ निकम यांच्यासह अनेक मान्यवरांनी विशेष उपस्थिती दर्शविली.

३८ व्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याच्या कीर्तनासाठी पंचक्रोशीतील भाविक भक्त, माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. हरिनामाच्या गजराने आणि संतविचारांनी खलाटवाडी परिसर भक्तिमय झाला. अशोक महाराज शास्त्री यांच्या प्रभावी कीर्तनातून हरिनामाची शिदोरी, संतांचे निस्वार्थ प्रेम, गोरगरिबांची सेवा, साधेपणा आणि निरपेक्ष परमार्थ यांचा संदेश भाविकांच्या मनावर ठसला.



# जीवाची बाजी लावून 'वर्दीतल्या माणसा'ने गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या !

जखमी अवस्थेतही कर्तव्यापासून डगमगले नाहीत,एस.टी. चालक-वाहकाचा जीव वाचवत दोन हल्लेखोरांना केले जेरबंद

मिरज प्रतिनिधी

हातात धारदार कोयते घेऊन एस.टी. बस अडवायची... बसच्या काचा फोडायच्या... चालक आणि वाहकावर जीवघेणा हल्ला करायचा... आणि समोर आलेल्या पोलिसालाही कोयत्याचा वार करायचा! मात्र या थरारक प्रसंगात एक वर्दीतला माणूस आपल्या जीवाची पर्वा न करता गुन्हेगारांच्या अंगावर धावून गेला आणि त्यांच्याच मुसक्या आवळल्या. पोलीस अंमलदार कोंडीबा बुधवार सरगर यांच्या या धाडसाने मिरजमध्ये खाकीतील कर्तव्यनिष्ठेचा पुन्हा एकदा प्रत्यय आला.

दि. २५ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे दहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज रोड, मार्केट यार्ड गेटसमोर ही थरारक घटना घडली. दोन हल्लेखोरांनी एस.टी. बस अडवून बसच्या काचा फोडल्या. त्यानंतर वाहक महादेव बाबासाहेब शिंदे यांच्यावर धारदार कोयत्याने वार केला, तर चालक परमेश्वर मुखदेव लामकानी यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण सुरू केली.

याचवेळी महात्मा गांधी चौक पोलीस ठाण्याचे बीट मार्शल पोलीस कॉन्स्टेबल कोंडीबा सरगर आणि धनंजय धुमडे परिसरात पेट्रोलिंग करीत होते. त्यांच्या नजरेस हा प्रकार पडताच त्यांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली.

समोर धारदार कोयते... परिस्थिती जीवघेणी... तरीही खाकी मागे हटली नाही.!

हल्लेखोरांपैकी एकजण पोलीस रेकॉर्डवरील सराईत आरोपी अब्दुलरहेमान अख्तर पटेल असल्याचे पोलिसांनी ओळखले. दोन्ही हल्लेखोरांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरू असतानाच झटापट झाली. यावेळी आरोपीने पोलीस अंमलदार कोंडीबा सरगर यांच्या पोटावर कोयत्याने वार केला.

वार झाला... शरीर जखमी झाले... पण कर्तव्याची जिद्द मात्र डगमगली नाही.!

# नासाच्या अभ्यास दौऱ्यासाठी समृद्धी शिंपलेचा दिमाखदार सत्कार.!

शिराढोणच्या लेकीने अमेरिका गाजवली, प्रतापसिंह पाटील यांच्या हस्ते गौरव

शिराढोण /प्रतिनिधी

अमेरिकेतील नासा अंतराळ संशोधन केंद्राच्या अभ्यास दौऱ्यासाठी निवड झालेल्या शिराढोण येथील विद्यार्थिनी कु. समृद्धी सतीश शिंपले हिचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट)चे जिल्हाध्यक्ष प्रतापसिंह पाटील यांच्या हस्ते शाल, वही, पेनबॉक्स व १,००० रोख बक्षीस देऊन दिमाखदार सत्कार करण्यात आला.समृद्धीच्या बुद्धिमत्ता व उल्लेखनीय यशामुळे शिराढोणसह धाराशिव जिल्ह्याचे नाव अमेरिकेपर्यंत पोहोचले आहे. यावेळी समृद्धीच्या आईचेही विशेष कौतुक करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती साकार करण्याची प्रेरणा समृद्धीच्या यशातून घ्यावी, असे उपस्थितांनी सांगितले.

यावेळी ज्येष्ठ हसन शेख, राजाभाऊ पाटील, पत्रकार बिलाल भाई कुरेशी, भाजपा ओबीसी सेलचे जिल्हा उपाध्यक्ष झेलम शिंपले, अशोक सोने, पाटील, मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

शिराढोणच्या लेकीने अमेरिका गाजवली! या अभिमानाने



ग्रामस्थांकडून समृद्धीवर कौतुकाचा वर्षाव होत असून, तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# सद्गुरु नराशाम महाराज मठ संस्थान येवती लघु आळंदी येथे वार्षिक संजीवन समाधी काल महोत्सव व अखंड हरिनाम सप्ताहास उत्साहात सुरुवात

मुखेड वार्ताहर -

मुखेड तालुक्यातील श्री क्षेत्र येवती येथील श्री सदगुरू नराशाम महाराज मठ संस्थान येथे वार्षिक संजीवन समाधीकाल महोत्सव व अखंड हरिनाम सप्ताहास बुधवारी दि.२६ ऑगस्ट २०२६ रोजी उत्साहात सुरुवात आहे. सप्ताह कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाची जय्यत तयारी करण्यात आली आहे.

मुखेड तालुक्यातील श्री क्षेत्र येवती येथे सदगुरु नराशाम महाराज यांचे जागृत मठसंस्थान आहे. श्री सदगुरू नराशाम महाराज यांची पुण्यतिथी व संजीवन समाधी काल महोत्सव आणि अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. वार्षिक संजीवन समाधी काल महोत्सव व अखंड हरिनाम सप्ताह दि.२६ऑगस्ट२०२६ ते दि. ०१ सप्टेंबर२०२६ या कालावधीत होत आहे. या सप्ताहात नियमित समाधी अभिषेक, नाम जप अनुष्ठान, गुरुचरित्र पारायण,ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, हरिपाठ, हरी किर्तन आदी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहास बुधवारी दिनांक २६रोजी उत्साहात सुरुवात आहे. या कालावधीत सर्वश्री ह. भ. प. धोंडीबा महाराज मोकासदरेकर, संतोष महाराज केरले, ब्रह्मानंद महाराज जाहुर, नरसिंग महाराज डोंगळीकर, बापूराव महाराज गणपुरकर,शंकर महाराज खिसे, कृष्णा महाराज राजूरकर आदींचे कीर्तन रात्री नऊ ते अकरा वाजता या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. महाभिषेक महाआरती महाप्रसाद व भंडारा मंगळवारी दिनांक १ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे.

महाप्रसादाची ( भंडाऱ्याचे) अन्नदाते श्री बालाजी गंगाराम पाटील इब्राहिमपूरकर व श्री बिरदेव किशनराव घोडके नांदेड

श्रीक्षेत्र पशुपतिनाथ (नेपाळ)येथे मे २०२७मध्ये शिव पुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. याकरिता ज्या भाविकांना यात सहभाग घ्यायचे आहे. त्यांची नावे या नंबर वर ९८२३२०९२०५,९४०४६६२८८८ नोंदणी केली जात आहे. वार्षिक संजीवन समाधी काल महोत्सव व अखंड हरिनाम सप्ताह सदगुरु



नराशाम महाराज यांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे. या कार्यक्रमाचा लाभ परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री सदगुरू नराशाम महाराज मठ संस्थान श्री क्षेत्र येवती व समस्त भक्तगणांनी केले आहे.

# जालन्यात पिस्तुलांचा धडाका तलवारींची धार पोलिसांचा धाक कुठे गेला?

## नागेवाडीत तरुणाचा धारदार शस्त्राने निर्घृण खून काळ्या स्कॉर्पिओतून आलेल्या चौघांकडून हल्ला

जालना शेख फारुक :- जिल्ह्यात गंभीर गुन्ह्यांच्या घटनांना आळा बसण्याऐवजी पिस्तूल,काडतुसे,तलवारी, चाकू आणि इतर धारदार शस्त्रांचा वापर होत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शहरासह ग्रामीण भागातही गुन्हेगारी घटनांची मालिका सुरू असल्याने पोलिसांचा धाक नेमका कुठे गेला असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. लहान-मोठ्या कारवायांची माहिती प्रसिद्धीपत्रकातून समोर येत असली तरी गंभीर गुन्हे रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावी करण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे.नागेवाडीत तरुणाची हत्या जालना शहरातील नागेवाडी परिसरातील झिरो पॉईंटजवळील एका हॉटेलमध्ये चहा घेत असलेल्या निखिल परमेश्वर पवार वय २४ या तरुणावर मंगळवारी ता.२५ रात्री साडेअकराच्या सुमारास धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला.या हल्ल्यात निखिल याचा मृत्यू झाला.

पोलिसांकडे दाखल झालेल्या फिर्यादीनुसार माझ्या मेलेल्या भाचीची बदनामी का करतोस? असे म्हणत संतोष उर्फ पिंट्या लांडे याच्यासह चौघेजण काळ्या स्कॉर्पिओमधून घटनास्थळी आले.त्यानंतर निखिलवर धारदार चाकूने हल्ला करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे.हल्ल्यानंतर संशयित काळ्या स्कॉर्पिओमधून पसार झाल्याचे सांगण्यात आले.

या घटनेमुळे नागेवाडी परिसरासह जालना शहरात खळबळ उडाली आहे.

चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

मयत निखिलचा भाऊ श्याम पवार यांच्या फिर्यादीवरून संतोष उर्फ पिंट्या लांडे, अर्जुन लांडे,सतीश आणि सोनू एखंडे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांसह ट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी, पोलिस निरीक्षक किरण बिडवे,पोलिस उपनिरीक्षक एम.बी.स्कॉट यांच्यासह पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. शस्त्रे येतात कुठून?

जिल्ह्यात यापूर्वी घडलेल्या काही गंभीर गुन्ह्यांमध्येही शस्त्रांचा वापर झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींच्या हातात पिस्तुले,काडतुसे आणि धारदार शस्त्रे पोहोचत असतील तर त्यांचा स्रोत नेमका कोणता हा महत्त्वाचा प्रश्न आहे.अवैध शस्त्रांची आवक रोखण्यासाठी पोलिसांकडून ठोस मोहीम राबविली जात आहे का? शस्त्रांची वाहतूक आणि पुरवठा करणाऱ्या साखळीपर्यंत तपास पोहोचतोय का? गंभीर गुन्ह्यांतील संशयितांकडील शस्त्रांचे नेटवर्क उघडकीस आणण्यासाठी स्वतंत्र पातळीवर प्रयत्न होणार का असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.

बैठका कारवाया आणि प्रसिद्धीपत्रकांपलीकडे कृतीची अपेक्षा गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांकडून वेळोवेळी कारवाया केल्या जातात. त्याची माहितीही प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली जाते. मात्र गंभीर स्वरूपाच्या घटना घडतच राहिल्यास प्रतिबंधात्मक पोलिसिंग अधिक प्रभावी करण्याची गरज अधोरेखित होते.

गुन्हा घडल्यानंतर आरोपींचा शोध घेण्याबरोबरच गुन्हा घडण्यापूर्वीच संभाव्य गुन्हेगारांवर लक्ष ठेवणे अवैध शस्त्रांचा शोध घेणे संवेदनशील भागात गस्त वाढविणे आणि गुन्हेगारी टोळ्यांच्या हालचालींवर नजर ठेवणे आवश्यक आहे.

लोकप्रतिनिधींनीही गांभीर्याने लक्ष देण्याची गरज

जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी हा केवळ पोलिस प्रशासनाचा विषय नसून नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित प्रश्न आहे.त्यामुळे पालकमंत्री, आमदार आणि खासदारांनी केवळ आढावा बैठकींपुरते मर्यादित न राहता पोलिस प्रशासनाकडून ठोस कृती आराखडा आणि त्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची गरज आहे.

शहरापासून ग्रामीण भागापर्यंत अवैध धंदे शस्त्रांची आवक आणि गुन्हेगारी टोळ्यांच्या हालचालींवर नियंत्रण मिळविण्यासाठी कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाईची अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.


नागरिकांच्या मनातील भीती दूर होणार कधी?

गुन्हा घडल्यानंतर आरोपींना अटक करणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच गुन्हे घडू नयेत यासाठी प्रभावी प्रतिबंधात्मक यंत्रणा उभी करणेही गरजेचे आहे.जालन्यात पिस्तूल, काडतुसे आणि धारदार शस्त्रांचा वापर करणाऱ्यांना कायद्याचा धाक वाटावा आणि सर्वसामान्य नागरिकांना निर्भय वातावरण मिळावे अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

शस्त्रे गुन्हेगारांच्या हातात आणि भीती नागरिकांच्या मनात ही परिस्थिती बदलण्यासाठी पोलिस प्रशासन आता नेमकी कोणती ठोस पावले उचलणार याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# श्रीमद् राघवेंद्र स्वामी यांच्या पुण्यतिथीनिमित्त तीन दिवसीय आराधना महोत्सव

अंबाजोगाई (प्रतिनिधी)- श्रीउत्तरादीमठ अंबाजोगाईच्या वतीने तीन दिवसीय श्रीमत् राघवेंद्र स्वामी पुण्यतिथी आराधना महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. दिनांक २९ ऑगस्ट पासुन प्रारंभ होणार्या या आराधना महोत्सवाची सांगता ३१ ऑगस्टला होईल. श्रीउत्तरादीमठ अनुराग कॉलनी स्वामी रामानंदतीर्थ महाविद्यालयासमोर असलेल्या मंदिरात हा आराधना महोत्सव होणार आहे.



श्रीमद राघवेंद्र स्वामी यांच्या पुण्यतिथी निमित्त होत असलेल्या या तीन दिवसीय आराधना महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. याच कार्यक्रमात वेदशास्त्र संपन्न श्री.अमोल राजाराम जोशी बीड यांचा वै.पं.वामनाचार्य जोशी स्मृती पुरस्कार देवून तर वै. रा.ज.संदीकर स्मृती पुरस्काराने सेवानिवृत्त ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती लताताई आरविंदराव कर्हाडे यांचा सत्कार करण्यात येणार आहे. या महोत्सवात पालखी भजन, किर्तन, आष्टोतर महापुजा असे विविध कार्यक्रम होणार असून नागरिकांनी या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन श्रीमत् राघवेंद्रस्वामी सेवा मंडळ अंबाजोगाईच्या वतीने करण्यात आले आहे.



# पावसाचा खंड पण कृषी विभागाचे मार्गदर्शन अखंड

अंबड प्रतिनिधी :-

पावसाने दडी मारल्याने कापूस उत्पादक शेतकऱ्यांसमोर पिकाच्या व्यवस्थापनाचे आव्हान उभे राहिले आहे.मात्र अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी घाबरून न जाता उपलब्ध ओलाव्याचे योग्य व्यवस्थापन करावे नियमित पीक निरीक्षण करावे आणि किडींचा प्रादुर्भाव वाढण्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात असे मार्गदर्शन तालुका कृषी अधिकारी बाळासाहेब गंडे यांनी केले.

अंबड तालुक्यातील मौजे कोळी सिरसगाव येथे पाणी फाउंडेशन कृषी विभाग आणि शिवेश्वर शेतकरी गट यांच्या संयुक्त विद्यमाने कापूस क्रांती योजनेअंतर्गत शेतकरी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कापूस पिकातील पावसाचा खंड उपलब्ध ओलाव्याचा कार्यक्षम वापर पीक निरीक्षण तसेच कीड-रोग व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

पावसाचा खंड पडल्यास जमिनीतील उपलब्ध ओलावा टिकवून ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी योग्य वेळी आंतरमशागत करावी तणांचे नियंत्रण करावे आणि पिकाशी होणारी पाणी व अन्नद्रव्यांची स्पर्धा कमी करावी.उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून शक्य असल्यास संरक्षित सिंचनाचे नियोजन करावे असा सल्ला गंडे यांनी दिला.पावसाच्या खंडामुळे कापूस पिकावर ताण येण्यासोबतच किडी व रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतकऱ्यांनी नियमितपणे शेताची पाहणी करून पिकाची वाढ पाने पात्या कळ्या तसेच किडींच्या संख्येचे निरीक्षण करावे. किडीची संख्या आर्थिक नुकसान पातळीच्या वर गेल्यानंतरच शिफारशीत कीडनाशकांचा वापर करावा, असे त्यांनी स्पष्ट केले.हवामानाचा अंदाज पिकाची अवस्था आणि जमिनीतील उपलब्ध ओलावा यांचा विचार करून खत व्यवस्थापन व फवारणीचे नियोजन करावे. पाऊस पुन्हा सुरू झाल्यानंतर पिकाची स्थिती तपासूनच पुढील व्यवस्थापनाचे निर्णय घ्यावेत असे आवाहनही गंडे यांनी केले.स्मार्ट शेती पची माहिती यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी तथा मेंटार अशोक सव्वाशे यांनी पाणी फाउंडेशनच्या स्मार्ट शेती पची माहिती दिली. पमधील गुणांकन पद्धती पीक व्यवस्थापनातील विविध बाबींचे मूल्यांकन तसेच त्याआधारे शेतीतील प्रगतीचा आढावा घेण्याच्या पद्धतीबाबत त्यांनी शेतकरी गटातील सदस्यांना मार्गदर्शन केले.कार्यशाळेचे आयोजन सहाय्यक कृषी अधिकारी सुवर्णा पाटील यांनी केले. कार्यक्रमास प्रभारी मंडळ कृषी अधिकारी सुनील पालवे उपकृषिअधिकारी किरण कोकाटे यांच्यासह कोळी सिरसगाव व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वर्दीतील माणुसकी..! जुना राजवाडा पोलिसांची तत्परता, अवघ्या काही तासात पाच वर्षीय श्रावणीचा शोध

## अंबाबाईच्या दर्शनासाठी आलेली चिमुकली नातेवाईकांपासून हरवली, पोलीस निरीक्षक किरण लोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली सीसीटीव्हीच्या मदतीने शोध

कोल्हापूर / क्राइम डायरी विशेष प्रतिनिधी सनी लोंढे

खाकी वर्दी म्हटली की, डोळ्यासमोर येते ती कायदा-सुव्यवस्था, गुन्हेगारांवरील कारवाई आणि कठोर शिस्त. मात्र याच वर्दीच्या आत एक संवेदनशील आणि माणुसकी जपणारे मनही असते. याचीच प्रचिती जुना राजवाडा पोलिसांनी पुन्हा एकदा करून दिली. श्री महालक्ष्मी मंदिरात दर्शनासाठी आलेली अवघी पाच वर्षांची चिमुकली श्रावणी महादेव यड्रवी नातेवाईकांपासून अचानक हरवली. पालकांच्या काळजाचा ठोका चुकला; मात्र जुना राजवाडा पोलिसांनी तत्काळ हालचाली सुरू करत सीसीटीव्हीच्या मदतीने चिमुकलीचा शोध घेत तिला सुखरूप पालकांच्या स्वाधीन केले.

श्रावणी महादेव यड्रवी ही आपल्या परिवारासह श्री महालक्ष्मी मंदिर, कोल्हापूर येथे दर्शनासाठी आली होती. दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास गर्दीतून ती आपल्या नातेवाईकांपासून अचानक दूर झाली. काही वेळ शोध घेऊनही तिचा ठावठिकाणा न लागल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली. अखेर पालकांनी तात्काळ जुना राजवाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण लोंढे यांच्याशी संपर्क साधला.

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक किरण लोंढे यांनी तातडीने पोलीस कर्मचाऱ्यांना मुलीचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या. महालक्ष्मी मंदिर परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात करण्यात आली. पोलीस शिपाई प्रदीप पोवार आणि पोलीस हवालदार उमेश चौगुले यांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज बारकाईने तपासत चिमुकलीच्या हालचालींचा माग काढला.

सीसीटीव्हीच्या माध्यमातून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी तातडीने शोधमोहीम राबवली आणि अखेर अवघ्या काही तासांत श्रावणीचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले. चिमुकलीला सुखरूप ताब्यात घेतल्यानंतर तिची ओळख पटवून तिला पालकांच्या स्वाधीन करण्यात आले.



मुलगी सुखरूप मिळाल्याचे समजताच पालकांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि सुटकेचा नि:श्वास हेच पोलिसांच्या कामगिरीचे खरे समाधान ठरले. पालकांनी जुना राजवाडा पोलिसांचे मनापासून आभार मानत त्यांच्या तत्परतेचे कौतुक केले.कायद्याची अंमलबजावणी करताना माणुसकी जपणाऱ्या जुना राजवाडा पोलिसांच्या या कामगिरीचे जनसामान्यांतून कौतुक होत आहे.

गर्दीच्या शहरात हरवलेल्या चिमुकलीसाठी खाकी धावली.!

कोल्हापूरच्या अंबाबाईच्या दर्शनासाठी दररोज ग्रामीण भागासह राज्याच्या विविध भागांतून हजारो भाविक येत असतात. अशा गर्दीच्या ठिकाणी एखादे लहान मूल नातेवाईकांपासून हरवणे ही कुटुंबासाठी अत्यंत काळजीची बाब असते. मात्र या प्रसंगी जुना राजवाडा पोलिसांनी दाखवलेली तत्परता आणि संवेदनशीलता निश्चितच कौतुकास्पद ठरली.

वर्दीच्या पलीकडे दडलेला माणूस...

गुन्हेगारांचा शोध घेताना कठोर भूमिका घेणारे पोलीस, एखाद्या हरवलेल्या चिमुकलीसाठी मात्र तितक्याच संवेदनशीलतेने धावून जातात. श्रावणीला पालकांच्या कुशीत सुखरूप परतवून देताना जुना राजवाडा पोलिसांनी वर्दीतील माणुसकी जिवंत असल्याचे दाखवून दिले.

# नेपाळ येथे अडकलेल्या नागरिकांसाठी मदत

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी

नेपाळमधील रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला आलेल्या भीषण पुरामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून, तेथे विविध देशांतील व राज्यातील अनेक पर्यटक अडकले आहेत.

या पार्श्वभूमीवर, तेथे अडकलेल्या नागरिकांची माहिती संकलित करण्यासाठी आणि त्यांना तात्काळ आवश्यक ती मदत पोहोचवण्यासाठी महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (मंत्रालय, मुंबई) यांच्यातर्फे खालील लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे:

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नागरिकांना आवाहन

जर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कोणतेही नागरिक किंवा पर्यटक नेपाळमध्ये अडकले असतील , तर त्यांच्या कुटुंबातील सदस्य किंवा नातेवाईकांनी वरील लिंकवर जाऊन त्यांची सविस्तर माहिती भरावी,असे आवाहन श्री. विनय गौडा जी. सी., जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

# राजेंद्र काळोखे यांच्या कुटुंबीयांची डॉ. विश्वासराव आरोटे यांच्याकडून सांत्वनपर भेट..!



पिंपरी चिंचवड प्रतिनिधी

श्रीक्षेत्र देहू गावचे सुपुत्र, दैनिक लोकमतचे पत्रकार तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या पिंपरी चिंचवड शहर शाखेचे सदस्य राजेंद्र काळोखे यांचे काही दिवसांपूर्वी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले.

त्यांच्या निधनाने क्रीडा, पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यांच्या कुटुंबीयांचे दुःख जाणून घेत दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी काळोखे कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी त्यांनी कुटुंबीयांना धीर देत दुःखात सहभागी असल्याचे सांगितले.

यावेळी डॉ. आरोटे यांनी काळोखे कुटुंबीयांना आर्थिक स्वरूपात रोख मदत, दुखवटा तसेच किराणा साहित्य देऊन सामाजिक बांधिलकी जपली. राजेंद्र काळोखे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व काळोखे कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, अशी भावना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

# सरकारची डोकेदुखी वाढणार; ओबीसींचा महामोर्चा काढण्याचा निर्णय

मुंबई : प्रतिनिधी

जनगणनेत ओबीसींचा स्वतंत्र कॉलम असावा या मागणीसाठी महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगर येथे राज्यस्तरीय भव्य ओबीसी मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले आहे.

सकल ओबीसी महामोर्चाच्या वतीने मंगळवारी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे राज्यव्यापी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. या बैठकीला विजय वडेट्टीवार यांच्यासह खासदार डॉ. प्रशांत पडोळे, माजी मंत्री महादेव जानकर, कुणबी समाजाचे नेते चंद्रकांत बावकर, सकल ओबीसी महामोर्चाचे मुख्य संयोजक उमेश कोराम आदी मान्यवर उपस्थित होते.

केंद्र सरकारकडून सुरू असलेल्या



जनगणनेच्या दुस-या टप्प्यात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी स्वतंत्र नोंद असताना ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम ठेवण्यात आलेला नाही. ओबीसींची अचूक लोकसंख्या समोर यावी आणि त्यानुसार सामाजिक न्यायाची धोरणे आखली जावीत, यासाठी जातिनिहाय जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम असलाच पाहिजे. या मागणीसाठी ओबीसी समाजातील सर्व संघटना, नेते आणि कार्यकर्त्यांनी एकजुटीने व्यापक लढा उभारण्याचा निर्धार केला आहे, अशी माहिती काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी दिली.

मराठवाड्यासह राज्यातील विविध भागांतील ओबीसी नेत्यांची बैठक घेऊन या मोर्चाची तारीख आणि पुढील नियोजन निश्चित केले जाणार आहे. या आंदोलनाच्या नियोजनासाठी सात सदस्यांची समिती स्थापन करण्यात येणार असून सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील ओबीसी नेते, खासदार व आमदार यांच्याशी संपर्क साधून त्यांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले जाणार आहे. ओबीसी मंत्री आणि ओबीसी लोकप्रतिनिधींनीही केंद्र सरकारपर्यंत समाजाच्या भावना पोहोचवाव्यात, यासाठी पंतप्रधान मोदी यांना पत्र लिहिण्याचे आवाहनही करण्यात येणार आहे.महाराष्ट्रात ओबीसींच्या सहाशे जाती असताना आकडेवारीत लाखो नोंदींचे आकडे कसे आले, हा गंभीर प्रश्न आहे. ओबीसींची खरी संख्या कळणार नसेल तर त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात धोरणे, आरक्षण आणि योजनांचा लाभ कसा मिळणार, असा प्रश्न वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.




**अखंड हरिनाम सप्ताहास शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत आप्पा नवले यांची भेट**

**भानकवाडी : श्री संत बाळूमामा देवस्थान, भानकवाडी ता. शिरूर (कासार), जि. बीड येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहास शिवसेना जिल्हाप्रमुख ड. चंद्रकांत आप्पा नवले यांनी भेट देऊन संत बाळूमामांचे दर्शन घेत आशीर्वाद घेतले. यावेळी ह.भ.प. एकनाथ महाराज गाडे, ह.भ.प. हनुमान महाराज कैतके, बापूसाहेब येळे, सरपंच साईनाथ कैतके, राहुल उत्तमराव सोनसळे, खंडू भानुदास सोनसळे, मोहन रानमारे, बाळू सोनसळे, राजेंद्र रणमारे, भाऊसाहेब रानमारे, सखाराम गोरे, उत्तमराव सोनसळे, राम कोकाटे, युवराज जाधव, नवनाथ भडके, पवन शेटे यांच्यासह परिसरातील असंख्य भाविक भक्त उपस्थित होते.**



आयुब भाई कुरेशींची प्रतापसिंह पाटील यांनी घेतली आस्थेवाईक भेट.!

शिराढोण - माजी सरपंच व दहा वर्षे उपसरपंच राहिलेले आयुब भाई कुरेशी यांच्या प्रकृतीची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट)चे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी निवासस्थानी जाऊन आस्थेवाईकपणे विचारपूस केली. यावेळी हसन शेख, राजाभाऊ पाटील, पत्रकार बिलाल भाई कुरेशी, झेलम शिंपले, अशोक सोने, पाटील, मोरे आदी उपस्थित होते.

# लक्ष्मीपुरी पोलिसांचा अवैध तीन पत्ती जुगारावर दणका,१५ जण ताब्यात

## लक्ष्मीपुरी पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक श्रीराम कन्हेरकर यांची दमदार कारवाई

कोल्हापूर /प्रतिनिधी

लक्ष्मीतीर्थ वसाहत परिसरात सुरू असलेल्या अवैध तीन पत्ती जुगार अड्ड्यावर लक्ष्मीपुरी पोलिसांनी धडक कारवाई करत १५ जणांना ताब्यात घेतले. ओमकार मिसाळ याच्या राहत्या घरी हा जुगार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी छापा टाकून ही कारवाई केली.

या कारवाईत पोलिसांनी रोख ३९ हजार ६०० रुपये, आठ मोटारसायकली आणि दहा मोबाईल हँडसेट असा मुद्देमाल जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ७ लाख ८६ हजार रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

ही कारवाई कोल्हापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री निलोत्पल अप्पर पोलीस अधीक्षक अण्णासाहेब जाधव उपविभागीय पोलीस अधिकारी प्रिया पाटील मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली




लक्ष्मीपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्रीराम कन्हेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संतोष कदम तसेच पोलीस अंमलदार प्रीतम मिठारी, मंगेश माने, तानाजी दावणे, किशोर पवार आणि रोहित ठोंबरे यांच्या पथकाने केली.

लक्ष्मीपुरी परिसरात खळबळ

लक्ष्मीपुरी पोलिसांच्या या कारवाईमुळे परिसरातील अवैध जुगार चालकांचे धाबे दणाणले असून, जुगाराच्या अड्ड्यांवर पोलिसांकडून कारवाईचा बडगा उगारण्यात आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

# तहसीलदारांवरच वाळू माफियांचा हल्ला

## कारवाईसाठी गेलेल्या अंबड महसूल पदकाला धक्काबुक्की तहसीलदारांच्या क्रुझरला हायवा ची धडक देत वाहन पळविले

अंबड प्रतिनिधी :

तालुक्यात अवैध वाळू उपशाचा धुमाकूळ आता एवढा वाढला आहे की कारवाई करण्यासाठी गेलेल्या अंबड महसूल अधिकाऱ्यांनाच वाळू वाहतूकदारांच्या मुजोरीला सामोरे जावे लागत आहे.गोंदी येथील सिद्धेश्वर गोदावरी नदीपात्रात बुधवारी सकाळी अवैध वाळू उपशावर कारवाई करण्यासाठी गेलेल्या महसूल पथकाला धक्काबुक्की व मारहाण झाल्याची धक्कादायक घटना घडली. एवढ्यावरच न थांबता तहसीलदारांच्या कारवाईसाठी वापरल्या जाणाऱ्या क्रुझर वाहनाला हायवाने धडक देऊन वाहन पळविण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे वाळू माफियांचा कायद्याला धाक आहे की प्रशासनाचाच धाक संपला? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

बुधवारी सकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास अंबडचे तहसीलदार सोमेश मोहिते हे महसूल पथकासह गोंदी येथील सिद्धेश्वर गोदावरी नदीपात्रात दाखल झाले. नदीपात्रात सुरू असलेल्या कथित अवैध वाळू उपशावर आणि वाहतुकीवर कारवाई सुरू असतानाच काही वाळू वाहतूकदारांनी महसूल पथकाशी हुज्जत घालत कारवाईला विरोध केल्याचे सांगण्यात येते.

याच वेळी झालेल्या झटापटीत तहसीलदार सोमेश मोहिते तसेच एका कोतवालाला धक्काबुक्की व मारहाण झाल्याची माहिती आहे. शासकीय अधिकाऱ्यांच्या अंगावर हात उगारण्यापर्यंत वाळू वाहतूकदारांची मजल जाणे ही केवळ गुंडगिरी नसून प्रशासनाच्या अधिकारालाच दिलेले खुले आव्हान आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे.

हायवाची क्रुझरला धडक वाहन पळविण्याचा प्रयत्न

कारवाईदरम्यान ताब्यात घेतलेल्या हायवा वाहनांपैकी काही वाहने घटनास्थळावरून पळवून नेण्याचा प्रयत्न झाल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. याच गोंधळात तहसीलदारांच्या कारवाईसाठी वापरल्या जाणाऱ्या खासगी क्रुझर वाहनाला एका हायवा ट्रकने धडक दिल्याची माहिती आहे.

महसूल पथक कारवाई करत असताना वाहन पळविण्याचा प्रयत्न झाल्याने घटनास्थळी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.मात्र पोलिसांनी तत्काळ धाव घेत



परिस्थिती नियंत्रणात आणली.पोलिसांची धडक पाच हायवा तीन दुचाकी ताब्यात घटनेची माहिती मिळताच गोंदी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक अमोल गुरले, पोलिस उपनिरीक्षक एस.एम. मुपडे तसेच पोलिस उपनिरीक्षक जंगले यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी कारवाई करत पाच हायवा आणि तीन दुचाकी ताब्यात घेतल्या.वाळू उपशासाठी वापरले जाणारे फावडेही पोलिसांनी जप्त केले आहे.दरम्यान महसूल विभागाकडून घटनास्थळी पंचनामा करण्याचे काम सुरू असून या प्रकरणी गोंदी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

अंबड तालुक्यात अवैध वाळू उपशाच्या तक्रारी यापूर्वीही समोर आल्या आहेत. मात्र आता थेट महसूल पथकाच्या कारवाईलाच विरोध करून अधिकाऱ्यांशी धक्काबुक्की मारहाण आणि शासकीय कारवाईसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनाला हायवाची धडक देण्यापर्यंत परिस्थिती पोहोचली आहे. त्यामुळे वाळू माफियांची ही मुजोरी नेमकी कुणाच्या आशीर्वादाने वाढली? हा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.शासनाचा महसूल बुडवून नदीपात्राची लूट करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या अधिकाऱ्यांनाच जर संरक्षणाची गरज भासत असेल तर सामान्य नागरिकांनी कायद्याच्या अंमलबजावणीवर विश्वास ठेवायचा तरी कसा? असा सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत.

तहसीलदारांवरच हात उगारणाऱ्या आणि महसूल पथकाच्या कारवाईला विरोध करणाऱ्यांवर प्रशासन आता किती कठोर कारवाई करते याकडे संपूर्ण अंबड तालुक्याचे लक्ष लागले आहे. पाच हायवा आणि तीन दुचाकी ताब्यात घेणे ही सुरुवात आहे मात्र या मुजोरगिरीच्या मुळापर्यंत पोहोचून सूत्रधारांवर कारवाई होणार का? हा खरा सवाल आहे.अवैध वाळू उपसा थांबविण्याची जबाबदारी असलेल्या प्रशासनालाच आव्हान देण्याची हिंमत कुणाच्या बळावर आली याचा तपास होणे गरजेचे आहे. अन्यथा आज महसूल अधिकारी उद्या पोलिस आणि परवा सामान्य नागरिक अशी कायद्याच्या धाकाचीच राखरांगोळी होण्याची भीती व्यक्त होत आहे.

# भररात्रीच्या थरारानंतर चंदनझिरा पोलिसांचा खाक्या ॲक्शन मोडमध्ये आवळल्या मुसक्या मुख्य आरोपीला १२ तासांत ठोकल्या बेड्या

## झिरो पॉईंटवरील अनधिकृत टपऱ्यांवरही फिरवला बुलडोझर गुन्हेगारांचे धाबे दणाणले

जालना शेख फारुक :-

चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील झिरो पॉईंट परिसरात २५ ऑगस्टच्या भररात्री झालेल्या थरारक हत्याकांडाने संपूर्ण शहर हादरले होते. निखिल परमेश्वर पवार या युवकावर धारदार चाकूने वार करून करण्यात आलेल्या निर्घृण हत्येनंतर परिसरात प्रचंड तणाव निर्माण झाला होता.मात्र कायदा-सुव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या गुन्हेगारांना चंदनझिरा पोलिसांनी अवघ्या १२ तासांच्या आत त्यांची योग्य जागा दाखवून दिली आहे. हत्येतील मुख्य सूत्रधार संतोष उर्फ पिंट्या हरीभाऊ लांडे याला पोलिसांनी बेड्या ठोकून गजाआड केले आहे.

थरारक हत्याकांड आणि पोलिसांचा तातडीचा रोख

२५ ऑगस्ट रोजी रात्री ११:३० वाजेच्या सुमारास झिरो पॉईंट परिसरात निखिल पवार याच्यावर प्राणघातक हल्ला करून त्याची हत्या करण्यात आली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक तेघबीर सिंग संधू आणि अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांच्या थेट मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी व पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी तात्काळ तपासाची चक्रे वेगाने फिरवली. गुप्त बातमीदार आणि तांत्रिक तपासाच्या आधारे कारवाई करत पोलिसांनी आरोपी संतोष उर्फ पिंट्या लांडे याच्या १२ तासांच्या आत मुसक्या



आवळल्या. न्यायालयाने आरोपीला २९ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून या प्रकरणातील फरार तीन आरोपींचा शोध घेण्यासाठी युद्धापातळीवर मोहीम राबवली जात आहे.

तणावपूर्ण परिस्थितीत संयम अन् पोलिसांचा खाक्या

हत्येनंतर परिसरात काही काळ गंभीर तणाव निर्माण झाला होता.मात्र पोलिसांनी अत्यंत तत्परता व्यावसायिक कौशल्य आणि संयम दाखवत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवली.गुन्हेगार कितीही हुशार असला तरी कायद्याच्या कचाट्यातून सुटू शकत नाही असा सज्जड इशाराच या कारवाईतून पोलिसांनी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना दिला आहे.गुन्हेगारांचे अड्डे उद्ध्वस्त अनधिकृत बांधकामांवर संयुक्त हातोडा

केवळ आरोपीला अटक करून पोलीस थांबले नाहीत तर ज्या झिरो पॉईंट परिसरात अनधिकृत हॉटेल टपऱ्या आणि अतिक्रमाणांमुळे गुन्हेगारांचा वावर वाढला होता त्या अड्ड्यांवर पोलीस महानगरपालिका आणि एमआयडीसी प्रशासनाने संयुक्त कारवाईचा बडगा उगारला. वाहतुकीला अडथळा ठरणारी आणि गुन्हेगारीला खतपाणी घालणारी सर्व अनधिकृत बांधकामे हटवून परिसर मोकळा करण्यात आला आहे.

ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्यासह पोउपनि दिगंबर पवार, निता दामधर, सय्यद अफसर, मारीयो स्कॉट, सफौ राजेंद्र ठाकूर, पोहेकॉ प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे, राजु पवार, अभिजित बायकोस, मदन बहुरे, विशाल लोखंडे, शरद पवार, संतोष वनवे, पोकॉ सागर खैरे, नवनाथ पाटील आणि पोहेकॉ हारुण पठाण यांच्या पथकाने केली. पोलिसांच्या या आक्रमक क्शन मोड मुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त होत असून गुन्हेगारांचे मात्र धाबे दणाणले आहेत.